# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०७-०७-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक ०७ जुलै २०१७ रोजी (दिनांक २०.०६.२०१७ रोजीची तहकूब सभा का.प.क्र ४३) मा.महापौर श्री. भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ०२.२५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम मुगळीकर भाप्रसे, नगर सचिव, श्री डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| १२. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १३. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १४. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १५. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १९. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| २०. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २१. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २२. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २९. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३०. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३१. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३६. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३७. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३८. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ३९. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४०. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४१. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४२. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४३. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४४. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४५. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४६. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ४७. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ४८. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४९. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५०. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५१. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५२. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५३. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५४. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५५. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५६. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५७. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५८. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५९. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६०. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६१. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६२. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६३. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६४. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ६५. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |

| | |
|---|---|
| ६६. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६७. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६८. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ६९. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७१. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७२. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७४. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७५. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७६. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७७. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७८. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७९. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ८०. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८१. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८२. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ८३. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८४. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८५. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८६. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८७. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८८. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ८९. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.नंदकुमार घोडेले :२२ जुन १७ रोजी देशाच्या सिमेवर देशाचे रक्षण करतांना महाराष्ट्रातील दोन जवान श्री.संदीप जाधव तसेच श्री.श्रावण माने यांना वीर मरण आले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

यास स.श्री.भाऊसाहेब जगताप श्री.प्रमोद राठोड श्रीमती समीना शेख यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे. शोक व्यक्त केल्या बाबतचा संदेश त्यांचे कुटुंबीयांना पत्राने कळविण्यात यावे.

या वेळी स्व.शहीद संदीप जाधव व श्रावन माने यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.राजू शिंदे :मनपाच्या इतिहासात पहिल्यांदाच भा.ज.पा.चे सरकारने मनपास १०० कोटी व यापुर्वी २४ असे १२४ कोटी विकास कामासाठी दिले. हा निधी आणण्यासाठी

प्रदेशाध्यक्ष मा.रावसाहेब दानवे, विधान सभा अध्यक्ष, मा.श्री.हरीभाऊजी बागडे, मा.आमदार, श्री.अतुलजी सावे तसेच मा.महापौर, श्री.भगवान घडमोडे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याबद्दल सर्वाचे अभिनंदन करावे तसे शासनास पाठवावे.

श्री.नंदकुमार घोडेले :ही पहिला घटना नाही. भुमीगत गटार, समांतर जलवाहिनी यासाठी मा.पालकमंत्री महोदय मा.खासदार श्री.खैरे साहेब यांनी केंद्र शासनाकडून मोठा निधी आणला. श्री.खैरे साहेब पालकमंत्री असतांना या शहरासाठी आधी किती तरी पटीने पैसा आणलेला आहे. रु.१०० कोटी आले त्याचे श्रेय लाटण्याचा कुणी प्रयत्न करू नये. हा निधी येणेसाठी मा.पालकमंत्री मा.खासदार मा.आमदार श्री.संजय सिरसाट मा.उपमहापौर श्रीमती घोगरे तसेच संपुर्ण सभागृहाचे यासाठी श्रेय लाभले आहे.

श्री.प्रमोद राठोड :स.श्री.राजू शिंदे यांनी जी नावे सुचविली त्या सर्व मान्यवरांचे तसेच मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडवणीस या सर्वाचे अभिनंदन करण्यात यावे तसेच ज्या वेळी आपण महापौर झालात तेंव्हा नागरीकांनी खड्डेचा प्रश्न केला तेंव्हा या शहरासाठी आपण निधी आणण्याचे आश्वासन दिले होते ते पुर्ण केले त्याबध्दल आपला सत्कार करायचा आहे.तो आपण स्वीकारावा.तसेच १०० कोटीचे रस्ते लवकरच पुर्ण करावे.

या वेळी मा.महापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येतो.

श्री.त्र्यंबक तुपे :राजकारण विषय बाजूला ठेवला पाहिजे.

श्री.नंदकुमार घोडेले :यामध्ये राजकारण होत आहे.

या वेळी काही स.सदस्य सभागृहातून बाहेर निघून जातात.

श्री.नासेर सिध्दीकी :१५० कोटी ऐवजी १०० कोटी देणार एवढे समाधानी होण्याची आवश्यकता नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कोणते रस्ते होणार आहे यादी जाहीर करावी.नसता आम्ही निशेध करू.

श्री.गंगाधर ढगे :कोणते रस्ते होणार आहे यादी दयावी.

श्री.नासेर सिध्दीकी :चीनने भारतावर वाईट नजर ठेवून कारवाया सुरू केल्या असे असतांना आपण चीन दौरा करीत आहे.याचा आम्ही निषेध करतो आपला दौरा रद्द करावा.

श्री.अजीम अहेमद :१०० कोटीत कोणते रस्ते करणार आहे.

श्री.प्रमोद राठोड :१०० कोटीच्या रस्त्याची कामे तातडीने सुरू करावे.

या वेळी चीन दौरा रद्द करावा, रस्त्याचे नावाची यादी जाहीर करावी अशी मागणी होते

मा.महापौर :मा.मुख्यमंत्री महोदय श्री.देवेंद्रजी फडवणीस मा.रावसाहेबजी दानवे मा.श्री.हरीभाऊजी बागडे मा.आमदार श्री.सावे साहेब यांनी यासाठी प्रयत्न केले त्या सर्वाचे अभिनंदन मा.आमदार यांनी सुचविलेले रस्त्याचे कामे यात घेणार आहे.

श्रीमती किंर्ती शिंदे :राज्य शासनाने १०० कोटीचा निधी दिला अभिनंदन करावे. निराला बाजार ते मनपा मुख्यकार्यालय रस्त्याचे पॅचवर्क करावे.झोन क्र.२ मध्ये सक्षमपणे काम करण्यास अधिकारी जे.ई कर्मचारी दयावे.तेथे पार्कींगची अडचण असल्याने नागरीक टॅक्स भरण्यास जात नाही. हे वार्ड कार्यालय पैठणगेट किंवा नागेश्वरवाडी येथील शाळेत शिप्ट करावे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्यांनी सुचना केली त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी या वार्ड कार्यालयासाठी कनिष्ठ अभियंता देण्यात यावे.

श्रीमती जोहरा बी नासेर:पत्र दिले आहे त्यानुसार कार्यवाही करावी. वार्डातील कोणतेही कामे होत नाही. आवश्यक कर्मचारी दयावे.

श्री रामेश्वर भादवे :झोन क्र.२ मध्ये कार्यालयीन काहीही सुविधा नाही तेथून ते पैठणगेट येथे मनपाची जागा आहे तेथे शिप्ट करावे.

श्री.फेरोज खान :पंधरा वर्षापासून तेथे वार्ड कार्यालय आहे. ते शिप्ट करू नये. पार्कीगची सुविधा तेथे आहे.

मा.महापौर :झोन क्र.२ साठी जेई दयावे तेथे विविध सुविधा नसल्यामूळे तेथील कार्यालय पैठणगेट येथे शिप्ट करावे.

श्री.फेरोज खान :यास माझा विरोध आहे.

श्री.प्रमोद राठोड :मागिल बैठकीत ग्रीन ५० या वसाहतीस पाणी देण्या संदर्भात चर्चा झाली व पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन पाणी देण्याचे सुचना केली होती सिडको हडको भागात आजही पुरेसे पाणी येत नाही. ५०ग्रीन येथे पाणी देण्याची कार्यवाही प्रशासनाने सुरू केली परंतु तेथे पाण्याचे कनेक्शन देऊ नये. बाजूलाच सातारा देवळाई भागातही पैसे देऊनच लोक पाणी घेतात.असे असतांना या एकाच वसाहतीसाठी पाणी का देत आहोत. तेथे पाणी देण्याची कार्यवाही थांबवावी या बरोबरच ४० ग्रीनची संचिकाही पाण्यासाठी दाखल केली.ही कार्यवाही थांबवावी. जेंव्हा पाण्याची उपलब्धता होईल तेव्हा पाणी द्यावे.

श्रीमती समीना शेख :कालच्या स्थायी समितीत स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारकासाठीच्या कामाकरीता पीएमसी नेमण्याचा ठराव होता त्यास स.सदस्य श्री.सय्यद मतीन यांनी विरोध केला त्याबध्दल एक शिष्ट मंडळाने स.सदस्य श्री.सय्यद मतीन यांचेवर गुन्हा दाखल करण्या बाबत निवेदन दिले या बध्दल आम्ही एमआयएम पक्षाच्या वतीने निषेघ करतो. व अशा पक्षाच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देणे योग्य नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :हर्सुल, सिडको, हडको भागासाठी आजही पाणी पुरेसे मिळत नाही. ५०-ग्रीन ही नवीन वसाहत होत आहे आणखीही वसाहती बिल्डर बांधत आहे. तेथे पाणी देण्याची कार्यवाही लगेच होते इतर जुन्या वसाहतीत पाणी दिले जात नाही. पाण्याची उपलब्धता होत नाही तोपर्यत ५०-ग्रीनला पाणी देऊ नये. अगोदर ज्या जुन्या वसाहती आहे तेथे पुरेसे पाणी दयावे.

श्रीमती माधुरी देशमुख :वार्ड क्र.८० मध्ये कमी दाबाने व २०-३० मिनिट पाणी येते असे असतांना जेथे पाणी देणे बंधन असतांना तेथे कमी पाणी दयायचे व तेच बचत होणारे दुसरीकडे दयायचे हे योग्य नाही.पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :मागिल बैठकीत यावर चर्चा झालेली होती व पाण्याची उपलब्धतता बघून प्रशासनाने निर्णय घ्यावा असे आदेशीत केलेले आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.नासेर सिध्दीकी :चीनचा दौरा रद्द करावा अशी आमची मागणी आहे.

श्री.प्रमोद राठोड :स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मृतीवन करण्याचा जो निर्णय झाला तो त्याच ठिकाणी झाले पाहिजे त्यास कुणीही विरोध केला तरी ठराव मंजूर केला आहे.त्यानुसार ताबडतोब कामास सुरूवात करावी.

श्री.अफसर खान :विद्यापीठ गेट येथील टाकीत पाणी येत नाही. ज्युब्लीपार्क येथील पंप बद असतो.

या वेळी एमआयएम पक्षाचे स.सदस्य चीन दौरा रद्द करण्याची डायस समोर जाऊन मागणी करतात.व राजदंड उचलून घेऊन जातात.

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ २-४६ वा. पुन्हा सभेला दु.३-०० वाजता सुरूवात होते, पुन्हा काही वेळाने सुरक्षा रक्षकाच्या मदतीने राजदंड डायस समोर आणला जातो.)

श्री.अफसर खान :तीन दिवसा आड पाणी येते टाकी भरली नाही तर पाणीच येत नाही नागरीक घरी येतात.त्यासाठी विदयापीठ गेट जवळील टाकीवर समर पंप बसविल्यास पाण्याचा प्रश्न सुटेल.

कार्य.अभि.श्री.चहल :स.सदस्याचे पत्र मिळाले त्यानुसार तेथील कामासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.महापौर :पाण्याचा महत्वाचा विषय आहे ताबडतोब कार्यवाही करावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :जुन्या शहरात उतार असल्याने टाक्याची लेव्हर लवकर येते सिडको हडकोत ती येत नाही या भागात पाणीटंचाई नियमीत असते नियमीत पाणी सोडण्यामध्ये गॅप असतो. जायकवाडी जलाशयात पाणी असुन सुध्दा पाणी टंचाई निर्माण होते.सिडकोच्या टाकीवरून टँकर भरण्याचे प्रमाण कमी करावे जुन्या शहरातील टाकीवरून टँकर भरावे जे की थोडया प्रमाणात सिडको हडकोचा पाणी प्रश्न सुटेल.

श्रीमती मुल्ला सलीम बेगम:जुन्या लाईन वरून घाण पाणी येते. ३-४ ठिकाणी लिकिजेस आहे तात्पुरते मेन्टन्संचे काम करावे.एक वर्षापासून पाणी टंचाई आहे.

कार्य.अभियंता-श्री.चहल:हमालवाडा भागात जुनी लाईन बदण्यासाठी २३ लक्षचे अंदाजपत्रक तयार करून तरतुदीसाठी लेखा विभागाकडे पाठविले.मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

श्री.अफसर खान :हमालवाडा भागातील जुनी लाईनला ३-४ लिकिजेस आहे ते बंद करावे.

मा.महापौर :श्री.चहल यांनी स्वत पाहणी करून येणारे घाण पाणी बंद करावे. कार्यवाही वेळेत करावी.

श्री.अब्दुल म.नावीद :अधिकारी यांनी व्हिजीट केली होती आठ दिवसात काम सुरू करणार होते महिना झाला काम केले नाही. माझ्या वार्डात वेदांतनगर टाकीवरून पाणी येते प्रेशर नाही. काही गल्ल्यामध्ये पाणी मिळत नाही.

कार्य.अभियंता(पापू) :वेदांत टाकीवरून क्रं.१०५ वार्डात पाणी जाते रेल्वे पटरी जवळ ३०० एमएम ची लाईन टाकल्यानंतरच पाणीपुरवठा सुरळीत होईल टेंडर काढून कार्यवाही होईल.

मा.महापौर :खराब पाणी येते ते बंद करावे नवीन पाईप टाकणेसाठीचे टेंडर नुसार ताबडतोब कार्यवाही करावी.

श्रीमती शोभा बुरांडे :टाकीची लेव्हल येत नसल्याने वार्डात पाणी टंचाई निर्माण झाली.

मा.महापौर :सदर ठिकाणी संबधीत अधिकारी यांनी व्हिजीट करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :५०-ग्रीन भागात पाणी दिल्यास सिडको हडको भागात येणारे पाणीपुरवठयावर परिणाम होणार एन-५ टाकीत पाणी कमी येईल. पाणी उपलब्ध होत नाही तोपर्यत ग्रीन-५० भागास कनेक्शन देऊ नये वार्ड ई मध्ये जे ई नाही. माझ्या वार्डात ड्रेनेजचे घाण पाणी येते मागिल वर्षीच्या कामाचे २-२ वेळेस टेंडर झालेले असतांना त्या संचिका गुंठेवारी विभागात पुन्हा अभिप्राय घेणेस, निधी किती उपलब्ध विचारणा करतात अशा संचिकाचा निर्णय लावावा.

श्रीमती माधुरी देशमुख :एन-३ मध्ये १५ घरांना ६-७ महिण्यापासून पाणी येत नाही.गुरू सहानीनगर भागात सुध्दा पाणी येत नाही सहा महिण्यापासून पाणी येत नाही टँकर मागविले तर तेही देत नाही.

कार्य.अभियंता-पापू :अंदाजपत्रक तयार करून कार्यवाही होईल प्रत्यक्ष पाहणी केली जाईल.

श्रीमती शोभा वळसे :म्हाडा कॉलनी श्रीकृष्णनगर भागात पाणी येत नाही अधिकारी फोन केला तर उचलत नाही.

मा.महापौर :स.श्रीमती बुरांडे श्रीमती वळसे श्री.जगताप श्रीमती देशमुख श्री.अफसर खान यांनी पाण्या विषयी तक्रारी केल्या त्या बाबत कार्यवाही करावी.

श्री.अय्युब खान :समांतर एजन्सी गेल्यानंतर पाणीपट्टीचे करातून किती उत्पन्न प्राप्त झाले. कितींना नोटीसा दिल्या. वार्डात लोक जातात कोणी किती पैसे भरले केंव्हा भरले डाटा मिळात नाही.

कार्य.अभियंता-श्री.चहल: वार्ड अधिकारी पाणी पटटी वसुली करतात.

मा.महापौर :किती वसुली होती याची सर्व माहिती पुढील सभेत दयावी.जे लोक पैसे भरण्यासाठी येतात त्यांचेकडून पैसे भरून घ्यावे किती वसुली झाली कितींना बिल दिले माहिती दयावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मागिल बैठकीत ऐनवेळी आकृतीबंधाचा ठराव घेतला. त्यात काही बदल करण्यात आले. तत्कालीन आयुक्त श्री.महाजन यांनी शासनाकडे पाठविलेला ठराव व आता केलेले बदल काय आहे? व ते कोणत्या नियमानुसार केले? २ जुलै २००८ रोजीच्या जी आर नुसार आर आर मध्ये काही बदल करायचा असेल तर त्याची नियमावली आहे त्यानुसार बदल केला का?

उपआयुक्त(आस्थापना) :दिनांक १७.०३.२०१७ रोजीच्या बैठकीत विषय क्र.९६२ नुसार आकृतीबंधचा ठराव घेण्यात आला. सर्व महापालिकेत सेवा भरती नियम एकच पाहिजे त्यानुसार शासनाने २००८ मध्ये सेवा भरती नियम मॉडल दिले. या नुसार ज्या काही सुचना होत्या त्या जे अधिकारी होते त्याचे मार्फत मागवायच्या ते गॅजेट मध्ये प्रसिध्द करायचे. जे बदल केले त्याप्रमाणे महासभेसमोर ठेवायचा व मान्यता झाल्यानंतर शासनाकडे पाठवायचा अशी प्रोसेस आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव दिला त्यात आठ प्रकारचे चेंजेस केले ते कोणत्या नियमाने केले.त्या संदर्भात हरकती सुचना घेतल्या का ? दिं.१७-३-१७ च्या सभेत ठरावात ८ क्रमांकावर दुरूस्ती केली ती कोणत्या नियमानुसार झाली.

उपआयुक्त-आस्थापना :प्रशासनाने ठेवलेल्या प्रस्तावानुसार परिशिष्ट ब मध्ये महासभेने ८ सुचना केल्या आणि ५६-४ परंतुकान्वये आयुक्ताचे वरिष्ठ प्राधिकरण स्थायी समिती आहे. स्थायी समितीचे वरिष्ठ प्राधिकारण महासभा आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :जे बदल केले त्या बाबतीत हरकती सुचना घेतल्या का? क्र.८ वर सहाय्यक संचालक नगर रचनाकार या पदाच्या संदर्भात बदल केला ते नियमाने करू शकतो का? त्या पदास शासन मान्यता आहे का?

उपआयुक्त-आस्थापना :संचालक नगर रचनाकार हे पद मंजूर आहे. परंतु त्यांच्या अर्हतेबाबत बदल केले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :तत्कालीन आयुक्त श्री.महाजन यांनी हे पद मंजूर नाही म्हणून मा.न्यायालयात ॲफीडेव्हीट करून दिले असतांना हे आकृतीबंध मध्ये का समावेश केले?

श्री.राजू शिंदे :शासनाने सेवा भरती नियम जे मॉडल तयार केले त्यानुसार प्रस्ताव दिला होता का? बदल करण्याचे अधिकार कुणाचे? सभेने मान्यता दिली का? विशिष्ट लोकांना फायदा मिळावा यासाठी बदल केले हे योग्य नाही. जवळपास ४५ प्रकारचे बदल यात केले हे अधिकार प्रशासनाला कुणी दिले. कमेटी केली होती का? कमेटीत सर्व विभाग प्रमुख होते का?

उपआयुक्त-आस्थापना :शासनाच्या नियमानेच केले आहे. बदल केले नाही. हे अंतिम करणेसाठी पाच लोकांची कमेटी होती. आस्थापना अधिकारी, विधी सल्लागार, शहर अभियंता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मुख्यलेखा परीक्षक, उपआयुक्त महसूल ई. होते.

श्री.राजू शिंदे :आरोग्य वैद्यकीय अधिकारी कमेटीत होते त्यांना प्रत्यक्ष विचारावे.

उपआयुक्त-आस्थापना :दोन वर्षाचा कालावधी झाला. त्यामूळे अधिकारी यांचे लक्षात नसेल.

श्री.राजू शिंदे :आकृतीबंध प्रस्ताव दिला. आर आर मंजूरीसाठी दिले नव्हते. हे दोन्ही प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याचे आदेशीत करावे. सुधारीत करून शासनास पाठवावे. सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांची कमेटी करावी सजेशन ऑब्जेक्शन मागवावे त्यानंतर सभेपूढे यावे.

श्री.प्रमोद राठोड :येणाऱ्या बैठकीत सविस्तर ठेवण्याचे आदेशीत करावे. त्यानंतर शासनाकडे पाठवावे.

श्री.राजू शिंदे :सफाई कर्मचारी यांचा यात समावेश करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :दैनिक वेतनावरील कर्मचारी यांचा समावेश करावा.

श्री.अफसर खान :दैनिक वेतनावरील कर्मचारी यांचा समावेश करावा. शासनाची मंजूरी घेऊन त्यांना सेवेत कायम करावे.

श्रीमती जयश्री कुलकर्णी:महिला बाल कल्याण समिती ही संविधानिक समिती असून एकूण वार्षीक बजेटच्या नुसार ५ टक्के निधी या समितीसाठी असतो. या समितीच्या माध्यमातून विविध विकास योजना राबविण्याकरीता स्वतंत्र अधिकारी कर्मचारी आवश्यक आहे. प्रारूप सेवा भरती नियम या राजपत्रात या पदाचा समावेश नसल्याने सेवा भरती नियमात महिला व बाल कल्याण अधिकारी या पदासाठीची अर्हत अशी नामनिर्देशनानुसार कुठल्याही शाखेचा पदवीधर, एमएस डब्ल्यु पदव्युत्तर पदवी आवश्यक, अखिल भारतीय स्थानिक संस्थेची एलजीएस परीक्षा उत्तीर्ण आवश्यक, पदोन्नतीने नामनिर्देशनात विहित केलेली अर्हता व धारण करणारे लिपीक संवर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देणे. प्रारूप सेवा भरती नियमात जसे स्वतंत्र समाज कल्याण विभाग दर्शवित आहे. तसेच महिला व बाल कल्याण विभाग करण्यात यावे.

| | |
|---|---|
| विधी सल्लागार | :संचालक नगर रचना या पदाच्या संदर्भात तत्कालीन आयुक्त यांनी मा.कोर्टात अपील केले आहे. परंतु त्याची नेमकी कन्टेम्स काय आहे? आता माहिती नाही पुढील सभेत माहिती दिली जाईल. |
| कु.सायली जमादार | :सातारा-देवळाई येथील कर्मचारी अद्याप मनपाच्या सेवेत रूजू करून का घेण्यात आले नाही? त्याच बरोबर आकृतीबंध मध्ये त्या पदाचा समावेश करावा. |
| श्री.कैलास गायकवाड | :सदर ४०-४२ कर्मचारी आहे. त्यांचाही यात समावेश करावे. |
| मा.महापौर | :जी सुचना केली. त्याची नियमानुसार पडताळणी करून सर्वसाधारण सभेपूढे आणावे. |
| श्रीमती ज्योती नाडे | :महिला बाल कल्याण विभागासाठी स्वतंत्र अधिकारी नाही. ज्यांचेकडे २-३ विभागाचे चार्ज असतो त्यांना या विभागाचे काम दिले जाते. त्यामूळे अनेक विकास योजनेच्या संचिका प्रलंबीत असतात. वेळेत कामे होत नाही. हा विभाग सक्षम होणेसाठी या विभागाकरीता स्वतंत्र अधिकारी द्यावेत. |
| मा.महापौर | :हा अनेक वर्षापासूनचा कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. त्वरीत कार्यवाही करावी. आकृतीबंधाच्या बाबतीत सेवा प्रवेश नियमाच्या प्रस्तावास मान्यतेसाठी आयुक्तांनी शासनाकडे २९ जानेवारी २०१६ ला सादर करावा असे सांगितले होते. सभागृहाचा मान न ठेवता प्रशासनाने आकृतीबंध प्रस्ताव परस्पर पाठविला होता. शासनाने तो प्रस्ताव परत पाठवून सभेची मान्यता घ्यावी. असे निर्देश दिले. आर आर मंजूर करण्याचे अधिकार सुध्दा या सभेचे आहे आकृतीबंध या बरोबर सेवा भरती नियम सुध्दा मंजूर करून पाठवावे असे शासनाचे निर्देश होते. त्याची मुदत ३० एप्रिल २०१७ पर्यंत होती, म्हणून तो ठराव केला होता. त्यात दुरूस्ती करण्याचे अधिकार सभागृहाला आहे. त्या दुरूस्त्या सुचवित असतांना ज्या वर्ग-क मनपा अमरावती, चंद्रपूर असेल पुणे मनपामध्ये सुध्दा माहिती घेणेकरीता कर्मचारी पाठविले होते. कुणावरही अन्याय होणार नाही. त्या दृष्टीने हे तयार करण्यास सांगितले होते. इतर वर्ग-क मनपाचे आर आर शासनाने मान्यही केले आहेत. असे असले तरी हा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेसाठी प्रशासनाने वरील प्रमाणे स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार आवश्यक त्या दुरूस्त्या असतील त्यासह सादर करावा. महीला व बाल कल्याण विभाग सक्षम झाला पाहिजे. पुर्ण वेळ अधिकारी देणेसाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. |
| श्री.गजानन बारवाल | :२४ वर्षाची समयवेतनश्रेणी कर्मचारी यांना देणेचे थांबविण्यात आलेले आहे जे कर्मचारी पात्र आहे त्यांना ती देण्यात यावी. |
| उपआयुक्त-आस्थापना | :१२,२४ वर्षाची कर्मचारी यांना समयश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव तयार केला २७ तारखेला बैठक आहे. |
| श्री.अय्युब खान | :एकाच विभागात १०-१० वर्षापासून कर्मचारी कार्यरत आहे त्याच्या बदल्या कराव्यात.नियम काय सांगतो स्पष्ट करावे.२-३ वर्षात त्यांची बदली करायला पाहिजे. |
| मा.महापौर | :शासनाच्या विभागामध्ये असलेले कर्मचारी यांच्या बदल्या कशा कराव्यात या बाबत शासनाचा कायदा आहे.मनपाच्या कर्मचांरी यांचे बदल्या व एका विभागात किती दिवस काम केले पाहिजे याचे धोरण निश्चित करण्याचे शासनाने |

ठरविले त्याप्रमाणे कार्यवाही सुरू झाली. ते धोरण ठरवतील तेव्हा त्यानुसार कार्यवाही करू

श्री.राजू शिंदे :या महापालिकेतील कर्मचारी यांचे अंतर्गत बदली बाबत आम्ही बोलतो हे शासन ठरवित नाही बदली करण्याचे अधिकार आयुक्तांना असतात.

श्री.अफसर खान :मनपातील कर्मचारी अधिकारी यांचे बदल्याचे अधिकार आयुक्तांना आहे शासनाचे नाही.

मा.आयुक्त :बदल्या नियमानुसार होतात जो पर्यत नियम व धोरण ठरवत नाही त्याप्रमाणे काम करता येत नाही.धोरण ठरवावे त्यानुसार काम करू

मा.महापौर :कामाचे स्वरूप बघून कर्मचारी दिलेले असतात. एकाच विभागातील सर्वाच्या बदल्या केल्यास कामास अडचणी येतील एकाच विभगातील ५० टक्के बदली करू शकतो.

श्री.अफसर खान :विद्यापीठ गेट रस्त्यावर ड्रेनेज लाईनचे पाणी रस्त्यावर वाहते श्री.विटेकर यांना फोन केला तरी उचलत नाही. त्यांची बदली संदर्भात ५-६ सदस्यांनी पत्र शहर अभियंता यांना दिले बदली का होत नाही.

श्री.कैलास गायकवाड :झोन क्र. ७ मध्ये अंदाजपत्रक तयार करण्यासाठी एक कनिष्ठ अभियंता देण्यात यावे.

मा.आयुक्त :श्री. विटेंकर काम करीत नसेल तर कार्यवाही करता येईल.

श्री.अफसर खान :५-६ महिने एक बदली करण्यासाठी लागत असेल तर योग्य नाही जे अधिकारी फोन उचलत नाही जनतेचे पैशातून ते पगार घेतात काम करीत नाही श्री.विटेकर यांची त्वरीत बदली करावी.ते काम करीत नाही अंदाजपत्रक करीत नाही जागेवर बसत नाही.

श्री.दिलीप थोरात :फोन उचलत नसतील त्या अधिका-यावर काय कार्यवाही करावी.

प्र.शहर अभियंता :श्री.विटेकर यांचे जागेवर दुसरे कर्मचारी नव्हते आता आऊटसोर्सेसवर कर्मचारी घेणार आहे त्यात बदली होणारच आहे.

मा.महापौर :या बाबतीत मा.आयुक्त यांनी शहानिशा करावी योग्य ती कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :बडीगिरणी येथील मनपाच्या शाळेचा स्लॅब पडायला आलेला आहे जिवीत हानी होऊ शकते कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे):सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार केले मंजूरीसाठी पाठविले आहे.

मा.महापौर :आता प्रश्नोत्तरे घेण्यात येते.

**प्रश्न क्रमांक ७१२ ते ७१६ :स.सदस्य श्री. राजू शिंदे**

श्री.राजू शिंदे :भुमिगत गटार योजनेच्या संदर्भात प्रश्न डीपीआर नुसार जे एसटीपी करायचे होते त्यात बदल झाले. पीएमसीला डीपीआर तयार करण्याचा मोबदला दिला जातो असे असतांना बदल होत असेल तर याची जबाबदारी कोणावर येते.डीपीआर नुसार काचंनवाडी येथे १३६.५ द.ल. सिध्दार्थ गार्डन ४.५ टीएमसी बनेवाडी ३० टीएमसी झाल्टा २० सिडको १५ व पडेगाव येथे १० टीएमसी आहे जो बदल केला तो कशासाठी केला.

कार्य.अभियंता(वि.ज.नि.प्रकल्प) :डीपीआर नुसार ६ एसटीपी होते जागेच्या अडचणीमूळे बदल करावे लागले.बनेवाडी येथे ३० टी.एम.सी. प्रस्तावना होती मध्यतरी तेथे १२ मी.डीपी

रोड टाकण्यात आला.डी पी रस्ता हा पुर्वी मंजूर होता परंतु STP च्या बाजूने रस्ता घ्यावा असे शहर अभियंता यांना कळविले होते.

श्री.राजू शिंदे :डीपीआर तयार करतांना तेथून रस्ता जात आहे माहिती होती असे असतांना तेथे STP टाकला असेल तर योग्य नाही.डीपी रस्ता येतो तो बदलता आला असता.तेथे महापालिकेचा हॉल होता क्वॉर्टर्स होते पंप हाऊस होता एवढे काढून सुध्दा तेथे ३० ऐवजी १० द.ल लि.एसटीपी बनविता.डीपीआर तयार करतांना ही चुक पीएमसीची झाली.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :डीपीआर नुसार काही ठिकाणी बदल करावा लागला.

श्री.राजू शिंदे :सिध्दार्थ उदयान येथील एसटीपीत का बदल केला.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :तत्कालीन आयुक्त यांचे आदेश होते की तेथील पाणी हे शुध्दीकरण करून वापरता येईल.प्लॅनींग झाले होते झु ऑथरीटीचे समिती आली होती एसटीपीमूळे जनावरांना इजा पोहचू शकते असे अक्षेप होता.

श्री.राजू शिंदे :झु ऑथरीटीची परवानगी न घेता डीपीआर मध्ये एसटीपी का टाकला होता.डीपीआरचा मतलब काय आहे.पीएमसी काम करते त्यांचे सांगण्यानुसार हे काम करणार असेल तर योग्य नाही. तसेच एअरपोर्ट च्या बाजूला एसटीपी टाकतो एनओसी घेतली नाही असे असतांना डीपीआर मध्ये कसे घेतले.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :एअरपोर्ट ची जागा मनपाचीच होती नंतर त्यांचे आब्जेक्शन आले.

श्री.राजू शिंदे :एअर पोर्टची परवानगी घ्यावी लागेल याचा विचार डीपीआर तयार करतांना पीएमसीने का केला नाही.तशीच चुक रेल्वे ट्रॅक कनेक्शनच्या ठिकाणची झाली ३.५० कोटीत काम होणार असे म्हटले आता तेच काम ७ कोटीत होणार आहे.रेल्वे ऑथर्टीची परवानगी घेतली नाही.तोंडी परवानगी घेतली असे त्यांचे म्हणणे आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :पीएमसीने प्रस्तावित केले होते की ब्रीज खालून लाईन जात आहे त्यामूळे तेवढा खर्च दिला होता.

श्री.राजू शिंदे :डीपी आर नुसार ३.५० कोटीचा खर्च दिला होता त्यापेक्षा जास्त खर्च होत असेल तर महापालिकेने देऊ नये पीएमसीकडून वसुल करावे. मी आयुक्तांना पत्रही दिले .३०-११-२०१६ च्या बैठकीत एकत्रित ठराव आणला दोन तीन विषय मंजूर केले त्यात असे दाखविले की इतकी बचत झाली इतर खर्च होत आहे.सिध्दार्थ गार्डनचा एसटीपी चेंज केला लाईन वाढल्या.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :डायमीटर वाढले लांबी वाढली नाही. वाढलेला खर्च जास्त नाही.

श्री.राजू शिंदे :एअरपोर्ट येथे एसटीपी होणार होता तो आता झाल्टा येथे करणार खर्च वाढला यास जबाबदार कोण? PMC ची चुक आहे वाढीव खर्च त्यांचेकडून वसुल करावा.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :कॅपीसीटी वाढविण्याकरीता एअरपोर्ट पासून पाणी झाल्टा पर्यत घ्यावे लागले लाईनची लांबी वाढली नाही डायमिटर वाढवावे लागले.खर्च वाढलेला आहे परंतु तो जास्त नाही.सेव्हींग मधून तो देता येईल.

श्री.राजू शिंदे :पीएमसी चुका करणार वाढीव खर्च करून ठेवणार व ते सेव्हींग मधून देणार यासाठी सेव्हींग करतो का ? सेंव्हीग रक्कमेतून मनपाला इतर कामे करता येतील. वाढीव खर्च पीएमसीकडून वसुल करावा. अधिकारी पीएमसीची

एजन्सीची बाजू घेऊन काम करतात.पीएमसीच्या चुका रेकॉर्डवर घेऊन कार्यवाही केली पाहिजे परंतु तसे होत नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :संबधीतास नोटीस दिली आहे खुलासा घेतला कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे :१३६ टीएमसीचे एसटीपी करायचे होते त्या ऐवजी १६१ चे झाले यात जो वाढीव खर्च होत आहे तो कोण भरणार आहे. हे करू शकतो का? डीपीआरमध्ये काय आहे? सिस्टीम राबवितांना चुक केली काही ठिकाणचे एसटीपी क्षमता कमी करणे काही रद्द करणे पुढे नेणे असा प्रकार करून भरपाई म्हणून ३० टीएमसी वाढवून १६१ टीएमसी केले.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :रिवाईज डिझाईन दिले त्यास आयटी पवई यांनी मान्यता दिली.

श्री राजू शिंदे :हा भुमिगत मधला भ्रष्टाचार आहे हे ओपन होणार आहे मी सर्व ठिकाणी पत्रव्यवहार केलेला आहे.सीबीआय पर्यत चौकशीची मागाणी आहे. एजन्सीने जागा घेण्यास मनपाने विनंती केली त्यामूळे एसटीपी झाला असे मागिल बैठकीत नमूद केले. या सभेपूढे तर तसा प्रस्ताव आलेला नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :पडेगाव येथे जागा पाहिजे होती स्थायी समितीची मान्यता घेऊन जागा दिली आहे.

श्री.राजू शिंदे :स्थायी समितीची सुध्दा रितसर मान्यता घेतली नाही कार्योत्तर मान्यता घेतली जी.बी.ची मान्यता नसतांना महापालिकेने विनंती केली असे दाखविले गेले. तसेच त्या जागेचे दर निश्चित करण्याचा अधिकार कोणास आहे? रस्त्याला लागून असलेली जागा व मागिल जागा यांचे एकच रेट लावून कमी दराने जागा दिली. एजन्सीला जागा घ्यायला लावली आता रेडीरेकणर नुसार पैसे देणार हे चुकीचे होत आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :रेडीरेकनर किंवा शासन जी आर जे नगररचना रेट ठरविल परंतु अदयाप पैसे दिले नाही.

श्री.राजू शिंदे :४० लक्ष मध्ये १ एकर जागा दिली. रेडीनेकनर रेट २ कोटी आहे तर संबंधीतास किती पैसे देणार? जमिन किंमत २५ लक्ष असेल रजिस्ट्री १ कोटीची करायची असेल तर तेवढे पैसे भरून रजिस्ट्री करता येते. तसे झाले तर संबधीतास किती रक्कम देणार आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे घेण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली का? २७-९ जागा घेतली रेडीरेकनर प्रमाणे पुढील वर्षी रेट वाढले तर त्याप्रमाणे रक्कम दयावी लागेल असे म्हटले. असे करता येते का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :जो आकस्मीत खर्च येणार आहे तो शासनाचा निधी त्यातून जे व्याज मिळेल त्यातून दयावे लागेल.

श्री.राजू शिंदे :मला उत्तर मिळाले त्यात असे म्हटले की मिळणारे व्याज शासनास परत करावे लागते एक अधिकारी सांगतात व्याजातून येणारे रक्कमेतून हा खर्च देऊ दुसरे एक अधिकारी सांगतात की व्याजाची रक्कम शासनास दयावी लागेल.सत्य काय आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :जर व्याजातून रक्कम देता आली नसती तर जागा उपलब्ध करून देणे मनपाचे काम होते तर भुसंपादनासाठी जी तरतूद असते त्यातून कार्यवाही करावी लागली असती.शासन जी आर नंतर आला.

श्री.राजू शिंदे :जागा लागणार आहे पीएमसीने डीपीआर मध्ये का दिले नाही. जागा देणे व इतर वाढीव जो काही खर्च पीएमसीच्या चुकीमूळे होत आहे ती रक्कम मनपाने देऊ नये अशी विनंती आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मनपाने झाल्टा येथे एसटीपी केलेला होता तो खर्च वाया गेला का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :त्याची माहिती सध्या नाही.

श्री.राजू शिंदे :२०-९-१६ मी पत्र देऊन वार्डातील इन्टरनल लाईन टाकाव्या सुचविले होते त्यावर उत्तर दिले की महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्ड यांचे आदेशानुसार प्रथमत: नाल्यातील मुख्य जलनि:सारण वाहीनीचे काम होत आहे.वार्डातील कोणतेच काम न करता ९६ टक्के काम केल्याचे कळवितात.माहिती देऊन ८ महिणे झाले तरी सुध्दा अदयाप नाल्यातूनच पाणी वाहते कारण काय? किमान व्याजाच्या पैशातून तरी वार्डात लाईन टाकता आल्या असत्या.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :मुख्य लाईन व एसटीपी संदर्भात झालेले कामा बाबत दिलेले होते डीपीआर नुसार ६० कि.मी होते आता रिवाईज झाल्याने ६७ कि.मी.लाईन टाकावी लागणार आहे ६३ कि.मी. झालेले आहे. क्रॉस कनेक्शन जोडणे बाकी आहे.

श्री.राजू शिंदे :सन २०१४-१७ तीन वर्षात काम झाले नाही. म.प्र.निं.मंडळाचे नियम पाळले जात नाही. या कामामध्ये अनेक ठिकाणी लाईन चेजेंस केल्या खर्चात वाढ झाली याची जबाबदारी कुणावर टाकणार आहे?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :झाल्टा एसटीपी ते चिकलठाणा येथे साडेतीन कि.मी लाईन एक्ट्रा टाकली त्यासाठी २ कोटी खर्च आहे.

श्री.राजू शिंदे :भुमिगत गटार योजना ४६४ कोटीची होती त्या पेक्षा जे एक्ट्रा पैसे खर्च होणार आहे ते पीएमसी, एजन्सी व अधिकारी यांचेकडून वसूल करावे. यांचे चुकीमूळे हा वाढीव खर्च झालेला आहे.तसेच नाल्यामधून लाईन टाकतांना नाल्याच्या मधोमध टाकली गेली ती बाजूला असायला पाहिजे. मोठे चेंबर बांधले गेले पावसाच्या पाण्यामूळे केरकचरा येऊन त्यास अडकला जे बांधकाम केले ते फिजीकली बरोबर आहे का? जेवढे सोपे असेल ते काम करून टाकले. अतिक्रमण आहे हे पीएमसीला माहित नव्हते का ?काही ठिकाणी चेजेंस केले.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :२६ ठिकाणी अतिक्रमण होते २१ ठिकाणचे काढून मार्ग मोकळा केला काम केले आता ४-५ ठिकाणचे अतिक्रमण राहिले आहे.

श्री.राजू शिंदे :कार्य.अभियंता म्हणून अधिकारी यांनी काय काम केले पीएमसीचे काम काय होते त्यांनी काय कामे केली केलेले काम योग्य आहे का? भविष्यात या चेंबरला धोका निर्माण होऊन नुकसान होईल. चोरी करणे व हिशोब ठेवायचा पीएमसी एजन्सीनेच करायचा असा प्रकार झाला आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :पीएमसीने चेक केल्यानंतर मनपाच्या विभागाचे कर्मचारी सुध्दा तपासणी करतात प्रत्येक ठिकाणची लेव्हल केल्यानंतर लाईन टाकतात.

श्री.अफसर खान :जे पाइप टाकले जात आहे ते बरोबर नाही

श्री.राजू शिंदे :बांगडी टाईप पाईप टाकतात काय?

कार्य.अभियंता :ते एमजीपीने बायडींग केले इस्टिमेंन्ट मध्ये एसडब्ल्युजी आणि आरसीसी होते. परंतु जेव्हा स्कुटणी डीपीआरची झाली की शासनाने डिपार्टमेन्ट आहे त्यांनी

बॉयडेंड केले डीडब्ल्यसी पाईप वापरा त्यानुसार ३०० च्या खाचले डायमीटरचे पाईप ठरविले आहे

श्री.राजू शिंदे :जे पाईप टाकले ते बोगस आहे. पुन्हा परत काढावे लागणार आहे. १५५ पैकी ५४ कि.मी.वापरले आहे. मेन चेंबर किती झाले. पीएमसीने डीपीआर मध्ये काय होते किती मिटरवर टाकायचे होते?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :९ हजार चेंबर असतील ९० मीटरवर एक चेंबर केले पीएमसीने जास्त तरतूद ठेवली होती परंतु तसे केले नाही. टेंडर पेक्षा कमी चेंबर केले.

श्री.राजू शिंदे :पीएमसीने सांगण्यानूसार चेंबर केले नाही भविष्यात अडचण आली तर पीएमसी सांगेल की आम्ही जबाबदार नाही.

श्री.प्रमोद राठोड :जी चूक केली मनपाचे नुकसान केले ते पीएमसी कडून वसूल करणार का ?

कार्य.अभियंता :सेव्हींग झाले त्यातून काही काम होणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर नुसार बदल केल्यास ही योजना फेल होईल असे पवई आयआयटी या संस्थेने रिपोर्ट दिला होता का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :त्यांनी जे जे सजेशन केले त्यानुसार २००-३०० डायमीटरची लाईन टाकली.

श्री.राजू शिंदे :नाले सफाई साठी पैसे खर्च केले का?

कार्य.अभियंता :नाले सफाईचे काम चालू आहे प्रत्येक झोन साठी ५ लक्ष खर्च होईल.

श्री.राजू शिंदे :खिल्लारी एजन्सीने नाल्यात लाइन टाकली त्यांनी माती बाजूला टाकली नाही मटेरियल विटा वगैरे नाल्यात पडलेल्या आहे त्यामूळे पाणी अडते व त्यासाठी मनपाला साफसफाईसाठी खर्च करावा लागतो तो त्या एजन्सीकडून वसूल करावा. काही ठिकाणी रस्ता खोदून लाईन टाकली ते रस्ते दुरूस्त केले नाही.

कार्य.अभियंता :काही काम केले आहे काही बाकी आहे.

श्री.राजू शिंदे :जे नॉम नुसार एजन्सीने रस्ते तयार करून दिले नाही. अनेक ठिकाणी आजही रस्ते खराब आहे.

कार्य.अभिंयता :एनजीपीने ठराविक सेक्शन दिले रस्ता खोदल्यानंतर रिपेरींग केल्यानंतर पुन्हा खोंदून रिस्ट्रोरेशन करायचे असते. ४० से.मीटरमध्ये दोन लेयर मध्ये डब्ल्यूबीएम करतो त्यानंतर १० से.मी.चे लेयर मध्ये डांबरीकरण होते.

श्री.राजू शिंदे :जे सांगतात त्याप्रमाणे एजन्सीने रत्याचे काम केले नाही. रस्ते दुरूस्तीसाठी किती तरतूद आहे? किती खर्च केले?

श्री.दिलीप थोरात :लाईन टाकणेसाठी रस्ते खोदतात त्यांची रिफीलिंग केली जात नाही. नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. अपघात होत आहे ज्ञानेश्वर नगर भागात एक ट्रकच्या अपघात झाला त्यात एक महिला जखमी झाली होती. २४ कोटीच्या रस्त्यासही उशीर झाला. या कामाची दखल घेण्याचे आदेशीत करावे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :या योजनेत रस्त्याचे रिफीलिंग साठी २३ कोटीची तरतूद आहे. ७-८ कोटी खर्च केले. संस्थान गणपती रस्त्याचे रिस्ट्रोरेशन केले. सहारा हॉटेल ते एमजीएम पर्यत रस्त्याचे कामाचे ताबडतोब रिस्ट्रोरेशन केले, रिफिलींग केले.

श्रीमती अंकिता विधाते :आकाशवाणी चौक पासून रस्ता जातो दोन्ही बाजूला खोदून ठेवले अपघात होत आहे, काम करीत नाही.

श्री.अफसर खान :डीपीआर नुसार जे काम दिले ते काम करून घ्यावे एक्स्ट्रा लागणारा खर्च मनपाने देऊ नये.

श्री.राजू शिंदे :एवढा खर्च होऊन सुध्दा रस्ते एजन्सीने दुरूस्त केल्याचे दिसत नाही.खोदलेलीच माती त्या ठेकेदाराने बुजविण्यासाठी वापरली व पैसे वसूल केले.कोणते रस्ते नॉम्स नुसार केले दाखवावे.यात ठेकेदाराची काम करण्याची तयारी आहे परंतु अधिकारी त्यांना काम करू देत नाही.एजन्सीची मुदत जुन मध्ये संपते आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :मुदतवाढ दिली आहे.

श्री.राजू शिंदे :मुदतवाढ किती दिवस दिली कशासाठी दिली कोणी दिली सभागृहासमोर आले नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :क्रॉस कनेक्शन,रोड रिस्ट्रोरेशन करायचे त्यासाठी वेळ लागेल.

श्री.अफसर खान :इंन्टरनल लाईन कोठे टाकल्या किती काम बाकी आहे. २३ कोटी रोड दुरूस्तीसाठी ठेवले ती रक्कम पीएमसी की एजन्सीला देणार आहे रस्ते कोण करणार आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :वार्ड वाईज यादी दिली जाईल ११० कि.मी.लाईन करणार आहे.क्रॉस कनेक्शन रस्त्याचे कामे झाल्यानंतर लगेच इन्टरनल लाईनचे काम होईल.

श्रीमती अंकिता विधाते :मुख्य लाईन किती टाकणे बाकी आहे.

कार्य.अभियंता-ड्रनेज :साडेचार कि.मी. टाकणे बाकी आहे.

श्री.विजय औताडे :वार्डातील १५ मी.डीपी रोड खोदून ठेवला दुरूस्तीचे काम केले नाही.ड्रेनेज फुटले लोकांच्या घरात पाणी जात आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :सदर भागात पाहणी करण्यात येईल.

श्रीमती माधुरी देशमुख :वार्डात मा.आयुक्तासह व्हिजीट दिली होती पूढे कार्यवाही नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :तेथे अतिक्रमण आहे स्वतः मालकाने अतिक्रमण काढून घेण्याचे कबूल केले.त्यामूळे काम थांबले आहे.

श्री.प्रमोद राठोड :पीएमसीवर नियंत्रण ठेवण्याची अधिकारी यांची जबाबदारी होती परंतु तसे झाले नाही.श्री.अफसर सिध्दीकी यांचेकडे अतिरिक्त कार्य.अभियंता,उपअभियंता चार्ज आहे त्यांचेकडे कार्य.अभियंता पदाचा अति.चार्ज जो आहे तो काढावा.मनपाचे पीएमसीचे एजन्सीचे एकाच अधिका-याकडे काम देणे योग्य नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :पुर्ण वार्डाचे अभियंता यासाठी मदत करतात.१५ अभियंते काम करतात.

श्री.अफसर खान :व्यवस्थीत काम होत नाही. कंपनीची साईड अधिकारी घेतात.

श्री.अब्दुल म.नाविद :साईटवर कुणीही दिसून येत नाही.

श्रीमती अंकिता विधाते :माझा वार्डातील वसाहत नाल्यापासून खालच्या लेव्हलला आहे. पाऊस आला की नाला पुर्ण पॅक होतो लोकांच्या घरात पाणी जाते. अतिक्रमण काढण्यास किती दिवस लागणार आहे?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :चार महिण्यात कार्यवाही होईल.

श्रीमती माधुरी देशमुख :सी सेक्टर मध्ये लोकांच्या घरामध्ये पाणी जाते एन-३ मध्ये तीच परीस्थिती आहे.एजन्सीला आपल्या अधिका-यांनी पाठीशी घालवू नये त्याचेकडून राहिलेले काम करून घ्यावे.

श्री. राजू शिंदे :या योजनेतून सेव्हींग कशी झाली त्या बाबत ३०-११-१६ च्या सभेत प्रशासनाचा विषय होता त्यात असे दिले की मुळ निविदेनुसार नक्षत्रवाडी येथे १६१

एमएलटी प्लॅन्ट होता त्यास ६१.९२ कोटी लागणार होते दुरूस्तीनंतर येणारी किमंत ७२ कोटी बनेवाडी येथे १० एमएलटी साठी १३.९६ कोटी दुरूस्तीनंतर ६.४४ कोटी बचत झाली ७ कोटी सिध्दार्थ गार्डन येथील ३.३६ कोटी बचत ३.३६ पडेगांव ६.६३ एमएलटी यात बचत १९ लक्ष झाल्टा ३५ एमएलटी १०.३३ दुरूस्ती केल्यानंतर १८.५९ कोटी यात ८.२६ कोटी बचत दाखवली विमानतळ जवळ प्लँन्ट मध्ये ८.१५ कोटी बचत ८.१५ असे दिले जेथे एसटीपी केला नाही ती बचत राहणारच आहे.कमी क्षमतेचे एसटीपी त्यात वाढ केली तो खर्च वाढला तो यात दिला नाही. पाईपचा खर्च वाढला तो यात दिला नाही.बचत झालीच नाही काम केलेच नाही तो पैसा बचत राहिला व दुसरीकडे वापरला ती बचत झाली असे प्रशासनाचे म्हणणे आहे. प्रस्तावात नमुद केल्यानुसार विविध कामे वाढली त्या खर्चासाठी २९ कोटीचा अतिरिक्त खर्च वाढत आहे. यात असे ही म्हटले की अतिरिक्त काम करावे लागते यासाठी २९.२३ कोटी एवढा खर्च अतिरिक्त बाबीसाठी करावा लागेल असे म्हटले व इतर बाबी मधून होणा-या बचतीमधून होणार असल्याने कोणताही वाढीव खर्च होत नाही हा वाढीव खर्च जी बचत होणार आहे त्यातून करणार आहे महापालिकेला टाकावे लागणार नाही असे मत प्रशासनाचे आहे. परंतु जी बचत होणार आहे ती रक्कम जात आहे यांचे चुकीमूळे ती अदा करावी लागणार आहे. यात १५० टक्के वाढ झाली ५० टक्के करण्याची सम्मती आहे. त्यामूळे शासनाने वाढीव खर्च रद्द केला.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :खुदाईच्या ॲटम मध्ये सॉप्ट कॉन्टेटीमध्ये वाढ झाली.

श्री.राजू शिंदे :हे करतांना ट्रायलफिट घेतली नाही. २४ कोटीचा पुल बांधतो तर ट्रायल फिट घेतो. यात चेंबर वाढलेले आहे. खर्च वाढला.हा सामुहिक भुमिगत जमिनी खालचा भ्रष्टाचार आहे त्यामूळे सखोल चौकशी करावी पवई आयआयटी संस्थेला चौकशीसाठी दयावे.तोपर्यत एक पैसा पीएमसीला एजन्सीला देऊ नये उलट त्यांची बँक गॅरेटी जप्त केली जावी पीएमसीच्या चुका एजन्सीने सुधारणे व अधिकारी यांनी त्यावर पडदा टाकण्याचे काम केले.पीएमसीला २ टक्के मनपाने दिले एजन्सी काही टक्केवारी देत असेल तर ते महापालिकेची बाजू घेणार नाहीच पीएमसी व एजन्सी एकच आहे अधिकारी त्यांना मिळाले.वाढीव दरही सादर केलेले आहे त्या प्रमाणे सध्या रक्क्म देण्याची गरज नाही.वेळेत काम केले नाही रस्ते खराब केले मालमत्तांचे नुकसान केले म्हणून त्यांचेवर गुन्हे दाखल करता येतो.

श्री.अफसर खान :तुर्त त्यांना पैसे देण्याचे थांबवावे.श्री.अफसर सिध्दीकी यांचा कार्य.अभियंता पदाचा चार्ज काढावा. पुर्ण रस्त्याचे काम झाल्यानंतर बील दयावे एक्ट्रा जो खर्च लागणार आहे तोही देण्यात येऊ नये.

श्री.विजय औताडे :वार्ड ७ मध्ये अर्धा कि.मी. लाईन साठी जागा खोदली काम पुर्ण केले नाही बील उचलले गेले चौकशी करावी.

श्री.राजू शिंदे :८ कोटी रस्त्यावर कोठे खर्च केले. भविष्यात ही सर्व कामे मनपाला करावी लागणार उशीराने त्यांचे काम न करता बील दिले जाणार असे होऊ नये.एजन्सी काम करण्यास तयार आहे अधिकारी काम करू देत नाही.या मागचे कारण काय?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :रिस्ट्रोरेशनचे काम करण्यास सांगितले आहे बीटीचे काम पावसाळयानंतर करावे लागणार आहे.

श्री.राजू शिंदे :या प्रकरणाची कठोर चौकशी करावी पवई आयआयटी संस्थेकडे चौकशी व्हावी श्री.अफसर सिध्दीकी यांचा चार्ज काढावा पीएमसी एजन्सीला देयके देऊ नये. भ्रष्ट्राचारास प्रशासनाने पांठीबा देऊ नये.चौकशी होईपर्यत कोणतेही बील देऊ नये बँक गॅरन्टी जप्त करावी.पीएमसी एजन्सीने केलेल्या चुका नेटवर टाकून कार्यवाही करावी जबाबदारी निश्चित करून होणारे नुकसान पीएमसी एजन्सीकडून वसुल करावे.

श्रीमती किर्ती शिंदे :महत्वाची योजना आहे योजना करतांना अनेक त्रुटी होत आहे या योजनेची पवई आयआयटी संस्थे मार्फत चौकशी करावी व १० वर्षासाठी देखभाल दुरूस्तीचे काम या एजन्सीकडूनच करून घ्यावे.

मा.महापौर :यापुर्वीही काही योजना केल्या त्यांचे कोर्ट प्रकरण झाले. अशा प्रकारे सभागृहाला वेठीस धरण्याचे काम होत आहे. सभागृह निर्णय घेते परंतु महापालिकेचीच चुक होते असे दाखवून त्यांचे पध्दतीने काम केले जाते. डीपीआर चेंज झाले नुकसान झाले. याची दखल पीएमसीने पुर्वीच घ्यायला पाहिजे होती. या कामात अनियमीतता झाली. रस्ते खराब झाले नाल्यातील काम व्यवस्थीत केले नाही. अनेक नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे क्रॉस कनेक्शन केले नाही. पीएमसी एजन्सीने काम बरोबर नाही. ही योजना पुर्ण राबविली पाहिजे. या सभागृहाची भावना लक्षात घेऊन एक समिती करण्यात येते त्यात स.श्री.राजू शिंदे श्री.भाऊसाहेब जगताप तसेच शिवसेना व एमआयएम पक्षाचे गटनेता जे एक एक नाव देतिल ते सदस्य तसेच टेक्नीकल पर्सन अधिकारी अशी पाच लोकांची समिती करण्यात येते या समिती मार्फत पुर्ण माहिती घेऊन पवई आयटी संस्थे मार्फत याची चौकशी केली पाहिजे. थर्ड पार्टी इनस्पेक्शन झाले पाहिजे.

श्री.राजू शिंदे :या योजनचे प्रमुख म्हणून जे अफसर सिध्दीकी यांना काम दिले तो चार्ज काढावा.

श्री.अफसर खान :अधिकारी कंपनीचे बाजू घेऊन काम करतात.यात मनपाचे नुकसान व नागरीकांना त्रास होत आहे.

मा.महापौर :अधिकारी यांची चुक असेल तर प्रशासनाने चौकशी करून योग्य तो निर्णय घ्यावा.

**<u>विषय क्रमांक १०८५:-</u>**

गुरूवार दिनांक २०.०४.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३८) व शनिवार दिनांक २९.०४.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३९) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

गुरूवार दिनांक २०.०४.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३८) व शनिवार दिनांक २९.०४.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३९) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक १०८६ :-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०८७:-** **(कार्यकारी अभियंता प्रभाग क्र.४,५,६,७ व ९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ७४,९६,५०२/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेले आहे या कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१६-२०१७ मधील प्राप्त अनुदानामधून करण्यात येईल.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ७४,९६,५०२/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करण्याच्या कामाचे रक्कम रुपये ७४,९६,५०२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०८८:-** **(कार्यकारी अभियंता प्रभाग क्र.४,५,६,७ व ९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ०४.१०.२०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील औरंगाबाद शहरास जागतिक वारसा शहर म्हणुन युनेस्कोद्वारे घोषित करण्यासाठी मा.मंत्रीमंडळाने तत्वतः मान्यता दिली आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने जागतिक वारसा शहर म्हणुन औरंगाबाद शहराचा प्रस्ताव नगर विकास विभागाच्या सहकार्याने व मान्यतेने केंद्र शासनामार्फत UNESCO या संस्थेस विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. वित्त विभागाने या प्रकरणी औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्प, नगर विकास विभागाच्या जागतिक स्थळांच्या सुविधा सुधारणे या साठीचा अर्थसंकल्प तसेच औरंगाबाद महानगरपालिका निधी मधुन या प्रयोजनासाठीचा खर्च करण्यात यावा असे अभिप्राय दिले आहेत.

तसेच मंत्रीमंडळाच्या सदर निर्णयाच्या अनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने खालील मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबत कळविले आहे. (१) औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद हे शहर जागतिक वारसा शहर म्हणुन घोषित करण्याचा महानगरपालिकेचा ठराव मंजुर करून घेण्यात यावा. (२) तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांची हेरिटेज समिती मार्फत औरंगाबाद हे शहर जागतिक वारसा म्हणुन घोषित करणेसाठीचा प्रस्ताव तयार करून शासन मान्यतेस्तव पाठविण्यात यावा. (३) औरंगाबाद शहर जागतिक वारसा म्हणुन घोषित करण्यासाठी होणारा आर्थिक खर्च औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्प व औरंगाबाद महानगरपालिका निधीमधुन करण्यात यावा.

करीता, मराठवाड्यातील औरंगाबाद शहर जागतिक वारसा शहर म्हणुन युनेस्कोद्वारे घोषित करणेसाठी तसेच या बाबतचा प्रस्ताव तयार करून औरंगाबाद महानगरपालिका हेरिटेज समिती मार्फत शासन मान्यतेस्तव पाठविणेसाठी आणि औरंगाबाद शहर जागतिक वारसा शहर म्हणुन घोषित करण्यासाठी होणारा आर्थिक खर्च औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्प व औरंगाबाद महानगरपालिका निधी मधून करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्रीमती माधुरी देशमुख :खर्च किती लागणार दिले नाही. अर्धवट प्रस्ताव आहे.

कार्य.अभियंता :औरंगाबाद शहर हे जागतिक वारसा शहर म्हणुन घोषित करायचे त्यासाठी ठराव करून शासनाकडे पाठवावा लागेल जो खर्च लागणार तो स्मार्ट सिटी व महापालिका निधी मधून तरतूद करावी लागेल.यासाठी सेन्ट्रल गव्हर्नमेंटचे फंड येण्यासाठी प्रयत्न होईल.

मा.आयुक्त :मा.मंत्रीमंडळाची झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने हे शहर जागतिक वारसा म्हणून घोषित करण्याचा ठराव घ्यायचा हे घोषीत झाले की राज्य,केंद्र शासनाकडून निधी मिळेल.जर मनपास खर्च करायचा असेल तर स्मार्ट सिटी प्रकल्प यातून करता येईल.

मा.महापौर :विषय मंजुर. जो खर्च होईल तो सभागृहासमोर सादर करण्यात यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मराठवाड्यातील औरंगाबाद शहर जागतिक वारसा शहर म्हणुन युनेस्कोद्वारे घोषित करणेसाठी प्रस्ताव तयार करून औरंगाबाद महानगरपालिका हेरिटेज समिती मार्फत शासन मान्यतेस्तव पाठविण्यास व यासाठी होणारा आर्थिक खर्च औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्प व औरंगाबाद महानगरपालिकेच्या निधी मधून करण्यास मंजूरी देण्यात येते व यासाठी जो खर्च होईल तो सभागृहासमोर सादर करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०८९:-** **(कार्यकारी अभियंता प्रभाग क्र.अ,क व ड)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई परिसरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी १३ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन खालील मशिनरी खरेदी करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२० दिनांक २०.०८.२०१५ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | मशिनरीचे नाव | नग | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १६ जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करणे. | 01 | 1516393/- | 1516393.00 |
| २. | हुकलोडर मशिनची उभारणी करणे. | 01 | 2770000/- | 2770000.00 |
| ३. | हुकलोडर बिन्स (क्षमता ९ घ.मी.) खरेदी | 07 | 520000/- | 3640000.00 |
| ४. | हायड्रोलिक हॉपर्स उभारणीसाठी चेसीस खरेदी | 12 | 359998/- | 4319976.00 |
| ५. | १.८ क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपर्सची उभारणी | 12 | 203200/- | 2438400.00 |
| ६. | ६० अश्वशक्ती ट्रॅक्टर (लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसह) | 01 | 1424200/- | 1424200.00 |
| ७. | टाटा एसके-१६१३ टिप्पर (क्षमता १० घ.मी.) | 01 | 1802914/- | 1802914.00 |
| ८. | २४० ली.क्षमतेचे डस्टबिन्स खरेदी करणे. | 200 | 7880/- | 1576000.00 |
| ९. | घंटागाड्या खरेदी करणे (१२ घ.फु.साईज) | 20 | 9880/- | 197200.00 |
| | | | **एकुण** | 1,96,85,083.00 |

सद्यस्थितीत सातारा-देवळाई परिसरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेचे हुकलोडर, स्कीपलोडर, टिप्पर्स, हॉपर्स व काही खाजगी लोडींग ॲटो नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच घनकचरा वाहतुकीसाठी आणखी ०४ हुकलोडर मशिन्सची खरेदी प्रक्रिया देखील सुरू आहे. त्यामुळे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२० दिनांक २०.०८.२०१५ प्रमाणे मान्यता मिळालेल्या सर्वच मशिनरी खरेदी करण्याची सध्या आवश्यकता नाही. तथापि, घनकचऱ्याच्या डोअरस्टेप कलेक्शनसाठी सध्या १२७ किरायाचे लोडींग ॲटो कार्यरत असुन, या खाजगी वाहनांच्या किरायापोटी मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. या शिवाय किरायाच्या बहुतांश वाहनांना हायड्रोलिक सिस्टीम नसल्यामुळे नाईलाजाने घनकचऱ्याची हाताळणी मानवी हाताने करावी लागत आहे. सदरील बाब घनकचरा व्यवस्थापन नियमाशी सुसंगत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता मंजुर मशिनरी ऐवजी घरोघरी घनकचरा संकलनाचे काम अधिक क्षमतेने करण्याच्या दृष्टिने ४० नग हायड्रोलिक हॉपर्स (क्षमता २ घ.मी.) खरेदी करणे जास्त संयुक्तिक होणार आहे. ४० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यासाठी रुपये १,९०,०८,०००/- खर्च अपेक्षीत असून हा खर्च भागविण्यासाठी १३ व्या वित्तआयोगाचा शासकीय निधी उपलब्ध आहे. करीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२० दिनांक २०.०८.२०१५ नुसार मान्यता मिळालेल्या मशिनरी ऐवजी १३ व्या वित्तआयोग निधीतून ४० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यासाठी रुपये १,९०,०८,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :९ वार्ड कार्यालय आहे. प्रत्येक वार्ड कार्यालयासाठी एक जेंटींग मशीन यातून खरेदी करावे. |
| श्री.दिलीप थोरात | :जेटींग मशीनला तत्कालीन आयुक्त यांनी खरेदी करण्याची मान्यता दिली होती. त्या बाबतीत काय झाले? |
| कार्य.अभियंता | :जेटींग मशीन खरेदीची कार्यवाही झाली. चेसीस चे काम चालू आहे. या महिन्यात तयार होतील.प्रत्येक झोन साठी एक असेल. |
| श्री.राजू शिंदे | :जुन्या गाड्यांचा लिलाव करून नवीन घ्यावे. कारण देखभाल दुरूस्तीचा खर्च किंमतीपेक्षा जास्त होत आहे. |
| मा.महापौर | :विषय मंजूर, सदस्यांची सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२० दिनांक २०.०८.२०१५ च्या मशिनरी खरेदीस मिळालेल्या मान्यतेनुसार सर्वच मशिनरी खरेदी करण्याची आवश्यकता नसल्याने त्या मशिनरी खरेदी ऐवजी प्रस्तावातील सर्व बाबी विचारात घेता घरोघरी घनकचरा संकलनाचे काम अधिक क्षमतेने करण्याच्या दृष्टिने ४० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्याकरीता रक्कम रुपये १,९०,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच हा खर्च १३ व्या वित्तआयोग निधीतून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०९०:-** **(कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५८ च्या पोट कलम (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणीपट्टी उपविधी-२०११ तयार केले असून सदर उपविधीस दिनांक ०६.०२.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने मान्यता प्रदान करून दिनांक १४.०३.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द केले आहेत. हे उपविधी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु झालेले आहेत.

उपविधीतील तरतुदींनुसार अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.११.२०१४ ते ३०.०१.२०१५ या कालावधीमध्ये अभय योजना राबविण्यात आली होती. त्यानंतर अभय योजनेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७८४ दिनांक ०२.०३.२०१५ अन्वये दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. तथापि, या कालावधीत सदर अभय योजनेस नागरीकांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याने व शहराची वाढती लोकसंख्या, कमी पडणारे पाणी, परिमाण लक्षात घेता अनधिकृत नळजोडण्यांवर अंकूश बसावा. याकरीता राबविण्यात आलेल्या अभय योजनेस मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.६२ दिनांक २०.०८.२०१५ अन्वये मंजुर ठरावानुसार दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२९९ दिनांक ०७.०१.२०१६ अन्वये मंजुर ठरावानुसार दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ व त्यानंतर दिनांक १८.०२.२०१७ मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.९०१ नुसार दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

तथापि, अद्यापही शहरामध्ये केलेल्या सर्वेक्षणानूसार मोठ्या प्रमाणात अनधिकृत नळजोडण्या अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येत आहे. शहरामधील अनधिकृत नळजोडण्यांची संख्या पाहता, सदरील अनधिकृत नळजोडण्या अधिकृत केल्यास पाणी चोरी थांबून महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होणार आहे. यासाठी अभय योजना लागू करणे महानगरपलिकेच्या हिताचे राहील. म्हणून मा.सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यापासून ते दिनांक ३१.०७.२०१७ पर्यंत अभय योजना लागू करणे व या मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळजोडणी धारकांविरुध्द उपविधीतील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.दिलीप थोरात :अभय योजनेची प्रभावीपणे अंमल करावा अनेक वसाहतीत तसेच मुख्य लाईनवरील अनधिकृत नळ मोठया प्रमाणात आहे अनधिकृत नळ शोधण्यासाठी मोहिम राबवावी पथक नेमावे.कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :सरसकट ५०० दंड आकारून रेग्यूलर करून घ्यावे. रेकॉर्डवर येईल उत्पन्न वाढेल.तीन महिण्याचे बील देऊन वसुली करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :घरोघरी जाऊन सर्वे करावा. समांतर कडे डाटा आहे तो घ्यावा. त्यानुसार कार्यवाही केली तरी उत्पन्न वाढेल. जे अनधिकृत आहे ते लिगल करावे.

मा.महापौर :अनेक वेळा मुदतवाढ देतो प्रभावीपणे कार्यवाही होत नाही लोक पैसे भरत नाही नळ कनेक्शन घेणे चालू आहे.त्यासाठी नाममात्र ५०० घेऊन रेग्यूलाईज करावे इलिगल दिसून आल्यास त्या मिळाकत धारकाच्या नावे बिल देऊन रेकॉर्डवर घ्यावे. त्या मिळकत धारकांच्या नावावे बिल अदा करावे. व तीन महिण्याची डिमांड देऊन कार्यवाही करावी. या प्रमाणे मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामधील अनाधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठीच्या अभय योजनेस दिनांक ३१.०७.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच स.सदस्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यास व मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळजोडणी धारकांविरूध्द उपविधीतील तरतुदींनूसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १०९१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, मिलींदनगर, एकनाथनगर, येथील नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी खालील विकास कामे करणे आवश्यक असून यासाठी शासनाच्या मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे

प्रस्ताव पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर, अंतर्गत विविध गल्ल्यांमधील कॉंक्रीटी करण करणे. | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०१, एकनाथनगर, मिलींदनगर अंतर्गत विविध गल्ल्यांमधील कॉंक्रीटीकरण करणे. | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०१, मिलींदनगर अंतर्गत विविध गल्ल्यांमधील कॉंक्रीटीकरण करणे. | २० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, एकनाथनगर, मिलींदनगर मधील राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या नाविण्यपुर्ण योजना नियोजन विभाग अंतर्गत खालील कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१ फुलेनगर, एकनाथनगर, मिलींदनगर येथील क्रिडांगण विकास करणे, मोकळ्या जागा विकसीत करणे, संरक्षण भिंती बांधणे व साहित्य उपलब्ध करून देणे. | ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, एकनाथनगर, मिलींदनगर मधील राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या दलितोत्तर योजना आर्थिक दुर्बल घटक वस्ती नियोजनाअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१, एकनाथनगर येथील गटार दुरूस्ती करणे. | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०१, मिलींदनगर येथील गटार दुरूस्ती करणे. | ३० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर येथील गटार दुरूस्ती करणे. | ३० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१०२, उस्मानपुरा येथील गटार दुरूस्ती करणे. | ३० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, एकनाथनगर,मिलींदनगर मधील राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती (विशेष अनुदान) योजनेअंतर्गत खालील कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर,एकनाथनगर,मिलींदनगर विविध गल्ल्यांमधील सिमेंट कॉँक्रीटीकरण करणे | ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर,एकनाथनगर,मिलींदनगर विविध गल्ल्यांमधील ड्रेनेज लाईन टाकणे | ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, एकनाथनगर, मिलींदनगर मधील नागरीकांच्या मुख्य पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवून त्यांचा जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी विकास कामे करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती, पाणीपुरवठा मंत्रालय योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर,एकनाथनगर,मिलींदनगर पीरबाजार मधील विविध गल्ल्यांमधील तसेच मुख्य पिण्याच्या पाण्याच्या 150mm/100mm/200mm/300mm ची जलवाहिनी टाकणे | २ कोटी ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर, एकनाथनगर, मिलींदनगर मधील राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१,फुलेनगर येथील सिमेंट रस्ते तयार करणे | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०१,मिलींदनगर येथील सिमेंट रस्ते तयार करणे | ३० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०१, एकनाथनगर येथील सिमेंट रस्ते तयार करणे | ५० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१०१,पीरबाजार येथील सिमेंट रस्ते तयार करणे | ५० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१०१,एकनाथनगर येथील ड्रेनेज लाईन टाकणे | ४० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.१०१,एकनाथनगर अंतर्गत नाला संरक्षण भींत बांधणे | ३० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१०१,फुलेनगर,मिलींदनगर येथील गटार दुरूस्ती करणे | ४० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१०१,फुलेनगर, मिलींदनगर, येथील समाजमंदीर बांधणे | ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १०९७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, पीरबाजार, उस्मानपुरा, फुलेनगर, मिलींदनगर मधील नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक विकास योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०१,पीरबाजार कुरेशी यांच्या घरापासून ते शेख लाला यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे | २५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०१,पीरबाजार रज्जाकभाई यांच्य घरापासून ते फारुखभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०१,मिलींदनगर नुराणी मस्जीदपासून ते असीपभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | २५ लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१०१, पीरबाजार येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे | २५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १०९८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर मधील नागरीकांच्या मुख्य पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवून त्यांचा जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी विकास कामे करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती पाणीपुरवठा मंत्रालय योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर मधील विविध गल्ल्यांमधील तसेच मुख्य पिण्याच्या पाण्याच्या 150mm/100mm/200mm/300mm ची जलवाहिनी टाकणे | २ कोटी ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्रीमती लता मगन निकाळजे, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १०९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर मधील चेतनानगर येथे राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या नागरीकांचा जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी विकास कामे करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर येथील घोरपडे यांच्या दुकानापासून ते लोखंडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ते तयार करणे. | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर येथील मोरे यांच्या घरापासून ते सुरडकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ते तयार करणे. | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर येथील जंजाळ यांच्या घरापासून ते मोरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ते तयार करणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर येथील बुध्दविहार पासून ते चव्हाण यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ते तयार करणे | ५० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्रीमती लता मगन निकाळजे, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर मधील सईदा कॉलनी, बशीरनगर येथील नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक विकास योजना अंतर्गत खालील विकास कामे करणेसाठी निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०४, पाणी फिल्टर सलीमभाई यांच्या घरापासून ते सईदभाई यांच्या घरापर्यंत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | ७५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०४ बशीरनगर विजया मिस्साळ यांच्या घरापासून ते फारुखभाई यांच्या घरापर्यंत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. | ७५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्रीमती लता मगन निकाळजे, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे श्रीकृष्णनगर ते मुख्य डीपी रस्त्यापर्यंत रहदारीचा मुख्य रस्ता आहे. या रस्त्याचे काम करण्याची नागरीकांची नेहमी मागणी असते. तेव्हा या डीपी रस्त्यासाठी शासनाच्या सर्वसाधारण रस्ता अनुदान या योजनेच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या प्राप्त अनुदानातून ३० लक्ष रुपये निधी सदरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याकरीता मिळावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी **अनुमोदक:-**श्रीमती खतीजा बी छोटू कुरेशी

मा.महापौर :सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराला जायकवाडी प्रकल्प व हर्सुल तलावातुन पाणी पुरवठा होतो, १९७२ सालची ७०० मि.मी. व्यासाची पाईप लाईन व १९९२ सालची १४०० मि.मी. च्या अत्यंत जुन्या पाईपलाईनद्वारे दररोज १३० एम.एल.डी.म्हणजे १३०० कोटी लिटर्सद्वारा पाणी पुरवठा होतो.

आज रोजी शहरातील अंदाजित लोकसंख्या १५ लक्ष व पर्यटक/विद्यार्थी/व्यापारी/नौकरदार यांची पाहुणी लोकसंख्या १ लक्ष अशी एकूण १६ लक्ष लोकसंख्या लक्षात घेता दररोज २१.६० कोटी लिटर्स पाणी पुरवठा आवश्यक आहे. म्हणजेच वार्षिक ७८.८४ दशलक्ष घनमिटर पाणी आवश्यक आहे. जुन्या झालेल्या पाईपलाईन मधून ३० टक्के पाणी गळती लक्षात घेवून गरज ही वार्षिक १०२.५० दशलक्ष घनमिटर एवढी ठरते.

सद्यस्थितीत १३० एमएलडी प्रमाणे वार्षिक पाणीपुरवठा केवळ ४७.४५ द.ल.घनमिटर एवढाच होत असून ३० टक्के पाणी वजा केल्यास केवळ ३३.२२ द.ल.घनमिटर एवढाच येतो.

मनपाचे जायकवाडी धरणातुन केवळ वार्षिक द.ल.घनमिटर पाणी उचलण्याचे करारानुसार आरक्षण आहे. वार्षिक गरज मात्र १०२.५० द.ल.घनमिटर एवढी आहे. शहराचा झपाट्याने होणारा विकास व जायकवाडीतुन येणाऱ्या नियोजीत समांतर पाईपलाईनचा होणारा विलंब लक्षात घेता शहराच्या विविध परिसरांना ३० किलोमीटर परिघातुन छोट्या धरणातून पाणीपुरवठा करण्याचे नियोजन देखील आवश्यक झाले आहे.

१. सातारा परिसरास सुखना किंवा परदरी साठवण तलावातून पाणीपुरवठा
२. वाळुज परिसरास टेंभापुरी प्रकल्पातुन पाणीपुरवठा
३. हर्सुलसह सिडको भागास सांजुळ प्रकल्पातून पाणीपुरवठा
४. सुखना धरणातुन पाणीपुरवठा मुकूंदवाडी परिसरास/लहूकी धरण

**याकरीता**

१. जायकवाडी धरणातुन पाण्याची आरक्षण मर्यादा ६० लक्ष द.ल.घनमिटर वरून १०२.५० द.ल.घ.मि.किंवा आगामी ०५ वर्षाच्या लोकसंख्येला पुरेल एवढी वाढावी.
२. ३० कि.मी.परिसरातील परदरी, सांजुळ, टेंभापुरी, सुखना, धरणातुन पर्यायी पाणीपुरवठा योजनेचा विचार करण्यात यावा.
३. सध्या होणारी पाणी गळती/पाणी चोरी याची निश्चित आकडेवारी ठरवून कमी करण्याकरीता उपाययोजना करण्यात यावी.
४. रेन वॉटर हार्वेस्टिंग धोरण कटाक्षाने पाळावे, त्या शिवाय शहरातील बांधकामांना परवानगी मंजूर करू नये.
५. सर्व मोठे गृह प्रकल्प, हॉटेल व इतर उद्योगांना पाणी शुध्दीकरण व पुर्नवापर सक्तीचा करावा.

या करीता औरंगाबाद महानगरपालिकेने जलसंपदा विभागाकडे १०२.५० द.ल.घ.मी.पाणी आरक्षणाची मागणी तात्काळ करणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-** श्री.रमेश भानुदास जायभाय

श्री कैलास गायकवाड :जायकवाडी प्रकल्प १९७२ ला स्थापन झाल्यानंतर तेथून ७०० व १९९० ला १४०० मि.मि व्यासाची लाईन टाकली. जायकवाडी व हर्सुल तलावातून पाणी पुरवठा शहराला करीत आहे. आता शहराची लोकसंख्या विचारात घेता १०२ एमएलडी पाणी उचलत असतांना ३० टक्के पाणी गळती होते. शहराची लोकसंख्या १५ लक्ष पर्यटक व इतर लोकसंख्या १ लक्ष असे १६ लक्ष लोकसंख्या होते. त्यांना पाणी देणे बंधनकारक आहे. हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवायला पाहिजे होता. का आणला नाही? व का शासनाकडे पाठविला नाही? जलसंपदा विभागाने त्यावेळी ६० द.ल.घ.मीटरची मान्यता दिली. आजची परीस्थिती बघता १०२ द.लक्ष घ.मीटरची आवश्यकता त्यानुसार प्रस्ताव ठेवला तो शासनाकडे पाठवावा. ५-७ वर्षापासून समांतर प्रकल्प राबावितो आज रोजी प्रकरण मा.कोर्टात आहे. आजच्या स्थितीत शहराला पुरेसे पाणी द्यायचे असेल तर पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. शहराच्या बाजूला ३० कि.मी. अंतरावरील प्रकल्प असल्यामूळे त्यातून कायदेशीर पाणी घेऊ शकतो. यासाठी सातारा परिसरातील परदरी साठवण तलावाची खोली वाढवावी. तेथून सातारा देवळाई भागात पाणी देता येईल. वाळूज परीसरात टेंभापूरी प्रकल्प आहे. तेथून एमआयडीसीला पाणी दिले तर एमआयडीला सध्या जायकवाडीतून देणारे पाणी शहरासाठी वळविता येईल. सिडको भागात सांजुळ प्रकल्पातून लाईन टाकून शहराला पाणी घेऊ शकतो. तसेच मुकूंदवाडी परीसरात सुखना व लहूकी धरण आहे तेथून पाणी पुरवठा घेऊ शकतो.या बाबतीत व्यवस्थीत प्रोजेक्ट तयार करून कार्यवाही करता येईल प्रस्ताव मंजूर करावा व शासनाच्या जलसंपदा विभागाकडे पाठवावा. मागे मराठवाडा गोदावरी जल विकास आराखडा संदर्भात चर्चा केली तो चुकीचा तयार झाला होता. आपण ठराव करून शासनाकडे पाठवला. त्यात मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दखल घेऊन त्यात शासन निर्णय करून तो दुरूस्तीसाठी ठेवला त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन करावे. पुर्वीच नियोजन केले असते तर पाण्याची शहरात टंचाई आली नसती. विनंती ही की हा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर :हा शहराच्या दृष्टीने चांगला प्रस्ताव ठेवला त्यामूळे स.सदस्य श्री. कैलास गायवाकड यांचे अभिनंदन करण्यात येते. भविष्यात जायकवाडीवर अवलंबून राहता येणार नाही. या धरणातील गाळ गाढण्याची कार्यवाही ४० वर्षात झाली नाही. नाशिक वरून येणाऱ्यो पाण्याची क्षमता भविष्यात कमी होऊ शकेल जो प्रस्ताव ठेवला तो चांगला आहे.

श्री.विजय औताडे :हर्सुल तलावात नहर आहे. ते पाणी नाल्याद्वारे वाहत जाते. ते तलावात साचले तर हर्सुलच्या विहीरीला पाणी राहील. परंतु काही शेतकरी तलावात पाणी राहू नये व शेती करता यावी म्हणून त्या शेतकऱ्यांनी ती नहर फोडून टाकली. जर तलावात नहर चे पाणी साचले तर हर्सुल व इतर वार्डात पाणी पुरवठा करता येईल. या बाबत ताबडतोब कार्यवाही करावी.

मा.महापौर :हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. त्वरील जलसंपदा विभागाला पाठवावा टेक्नीकल दृष्ट्या हे योग्य आहे किंवा कसे? याची तपासणी करावी. ज्या सुचना केल्या त्याही विचारात घ्याव्यात.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरासाठी जायकवाडी धरणातुन केवळ वार्षिक द.ल.घनमिटर पाणी उचलण्याचे करारानुसार आरक्षण असून वार्षिक गरज १०२.५० द.ल.घनमिटर एवढी असल्याने शहराच्या विविध परिसरातील ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या परिघातुन छोट्या धरणातून पाणीपुरवठा करण्याकरीता खालील बाबींचे नियोजन करून जलसंपदा विभागाकडे १०२.५० द.ल.घ.मी.पाणी आरक्षणाची मागणी तात्काळ करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. जायकवाडी धरणातुन पाण्याची आरक्षण मर्यादा ६० लक्ष द.ल.घनमिटर वरून १०२.५० द.ल.घ.मि.किंवा आगामी ०५ वर्षाच्या लोकसंख्येला पुरेल एवढी वाढावी.
२. ३० कि.मी.परिसरातील परदरी, सांजुळ, टेंभापुरी, सुखना, धरणातुन पर्यायी पाणीपुरवठा योजनेचा विचार करण्यात यावा.
३. सध्या होणारी पाणी गळती/पाणी चोरी याची निश्चित आकडेवारी ठरवून कमी करण्याकरीता उपाययोजना करण्यात यावी.
४. रेन वॉटर हार्वेस्टिंग धोरण कटाक्षाने पाळावे, त्या शिवाय शहरातील बांधकामांना परवानगी मंजूर करू नये.
५. सर्व मोठे गृह प्रकल्प, हॉटेल व इतर उद्योगांना पाणी शुध्दीकरण व पुर्नवापर सक्तीचा करावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११०३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४ मध्ये रविंद्रनगर दलित वसाहत असून येथे अनेक गोरगरीब लोक राहतात. येथील खालील कामे दलितवस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.४४ येथील रविंद्रनगर भागात नविन जलवाहिनी टाकणे. | २५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.४४ येथील रविंद्रनगर भागात कॉंक्रेट रस्ते तयार करणे | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.४४ येथील रविंद्रनगर भागात विद्युतीकरणाचे कामे करणे. | २० लक्ष |

**सुचक:-** श्रीमती साजेदा सईद फारुखी सईद फारुखी **अनुमोदक:-** श्रीमती सरीता अरूण बोर्डे

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७१ मधील खालील कामे अल्पसंख्यांक विकास योजनेअंतर्गत करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा भागातील रस्ते विकसीत करून कॉंक्रेटींग करणे. | ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रेटींग रस्ता तयार करणे. | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७१ मध्ये विविध ठिकाणी पोल व दिवे लावणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.७१,उस्मानपुरा, छोटा आशुरखाना, शहा कॉलनी येथे विविध दैनंदिन मुलभूत सुविधा व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | २० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती सरीता अरूण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७१ ही दलित वसाहत असून अनेक गोरगरीब लोक येथे राहतात. येथे खालील कामे दलित वस्ती सुधार योजना (विशेष अनुदान) अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७१ येथील भिमपुरा भागात नविन जलवाहिनी टाकणे. | २५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७१ येथील भिमपुरा भागात कॉंक्रेट रस्ते तयार करणे | २५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७१ येथील क्रांतीनगर भागात नविन सुलभ शौचालय बांधणे, त्या ठिकाणी पाण्याची टाकी बांधणे, विद्युतीकरण करणे व इतर कामे करणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.७१ येथील क्रांतीनगर भागात अंतर्गत गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे. | ३० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती सरीता अरूण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, बुढीलैन, कबाडीपुरा या वॉर्डात ६०% दलित लोकांची वस्ती असून या भागामध्ये विकास कामे पाहिजे त्याप्रमाणे झालेले नाही.

मो.किलेअर्क पंचकुवा हा भाग दलित वस्ती सुधार योजनेमध्ये येत असून आज पर्यंत येथे कोणतेही विकास कामे झालेले नाही. येथील पाण्याचा प्रश्न, रस्त्याचा प्रश्न अतिशय गंभीर असून या भागात विकास करण्यासाठी ठेवलेल्या राखीव निधीतुन रुपये १.९० लक्ष मंजुर करून प्रस्ताव शिफारस करून शासनाकडे पाठविणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी अंतर्गत काद्रीया कॉलनी मध्ये ऊर्दु व मराठी बालवाडी सुरु करण्यात यावी. जेणेकरून येथील लहान मुले/मुली शिक्षणा पासुन वंचित राहणार नाही व त्यांना शाळेत जाण्याची सवय लागेल.

करीता बालवाडी सुरु करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिल्लीगेट व शहागंज येथील जुने पाण्याचे पंप हे अत्यंत जुने झालेले आहे आणि ते १०० हॉर्सपॉवरचे असल्याने ते पुरेशा प्रमाणात काम करीत नसल्याने शहरातील जुन्या औरंगाबाद मधील १७ वॉर्डाचा पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. दिल्लीगेट व शहागंज येथील प्रत्येकी दोन प्रमाणे १०० हॉर्सपॉवरचे पंप बदली करून त्या ठिकाणी नवीन १५० हॉर्सपॉवरचे पंप बसविल्यास पाणी पुरवठा सुरळीत होईल व पाण्याची समस्या दुर होईल.

आज शहागंज येथील पाण्याच्या टाकीत पाणी येण्यास फार अडचणी निर्माण होत असल्याने या टाकीतून पाणी पुरवठा होणाऱ्या १७ वॉर्डांना आठवड्यातुन १ दिवस पाणी मिळते. ते ही ३० ते ४० मिनीटे व कमी दाबाने या ठिकाणची अडचण दुर करण्यासाठी शहागंज येथे ३८ लक्ष लिटरचे सम बांधणे आवश्यक आहे. शहागंज पाण्याची टाकी येथे जोपर्यंत सम बांधण्यात येत नाही, तोपर्यंत क्रांतीचौक टाकीचे दोन पंप २४ तास सुरु ठेवून शहागंजच्या टाकीला पाणी देण्यात यावे. जेणेकरून येथील १७ वॉर्डांना शहरातील इतर वॉर्डाप्रमाणे ३ किंवा ४ दिवसाआड पाणी उपलब्ध होईल.

करीता, दिल्लीगेट व शहागंज येथील प्रत्येकी जुने २ पंप बदलुन त्या ठिकाणी १५० हॉर्स पावरचे पंप बसविण्यास व शहागंज येथे ३८ लक्ष लिटरचे सम बांधण्यास अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सय्यद मतीन रशीद **अनुमोदक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यारखान

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१८, जयसिंगपूरा मध्ये बीबी का मकबरा व पानचक्की, बेगमपुरा चौक असल्यामुळे जगभरातील हजारो पर्यटक दोन्ही ऐतिहासीक स्थळे बघण्याकरीता येतात. करीता, माझ्या स्वेच्छानिधीतून वरील ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरा बसविणे आवश्यक आहे.

करीता, माझ्या स्वेच्छानिधीतून वरील काम मंजुर करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अफसर खान यासीन खान **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१८, जयसिंगपूरा येथील बीबी का मकबरा, पानचक्की व बेगमपुरा चौकामध्ये स.पालिका सदस्य श्री.अफसर खान यासीन खान यांच्या स्वेच्छानिधीतून सी.सी.टी.व्ही.कॅमेरा बसविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची स्मार्टसिटीकडे वाटचाल करीत असतांना महानगरपालिकेतील वर्ग-१ ते वर्ग-३ अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश असावा असे मत आहे.

तरी, गणवेशाची प्रथा सुरु करण्यासाठी पहिल्या वर्षी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी गणवेश खरेदीसाठी रक्कम रुपये १० लाख तरतुद ठेवण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कचरु छगनराव घोडके **अनुमोदक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील वर्ग-१ ते वर्ग-३ अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश खरेदीसाठी रक्कम रुपये १० लाख तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरात रहिवासीयांना जलतरणाची आवड निर्माण होऊन रहिवासीयांना जलतरण सुरु केल्यास त्याचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल व त्या माध्यमातून मनपाच्या सिध्दार्थ जलतरण तलावाचे आर्थिक उत्पन्न वाढेल यासाठी शहरातील औरंगाबाद अमॅच्युअर ॲक्वेटीक असोसिएशन यांच्या मार्फत राज्यस्तरीय निमंत्रित महापौर चषक जलतरण स्पर्धा घेण्याचे मानस आहे.

सदरील राज्यस्तरीय निमंत्रित महापौर चषक जलतरण स्पर्धासाठी अंदाजे २.५० लक्ष रुपये खर्च अपेक्षीत आहे. सदरील रक्कम मनपाच्या क्रिडा लेखाशिर्षा अंतर्गत मंजुर करून रक्कम उपलब्ध करून

संघटनेच्या नावे देण्यासाठी व स्पर्धा आयोजनाची परवानगीसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कचरु छगनराव घोडके **अनुमोदक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे

मा.महापौर :विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील औरंगाबाद अमॅच्युअर ॲक्वेटीक असोसिएशन यांच्या मार्फत राज्यस्तरीय निमंत्रित महापौर चषक जलतरण स्पर्धा घेण्यास व या स्पर्धेसाठी येणाऱ्या अंदाजीत र.रु.२.५० लक्षचा खर्च क्रिडा लेखाशिर्ष अंतर्गत मंजुर करून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास व सदरील रक्कम संघटनेच्या नावे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वच्छता अभियाना अंतर्गत वॉर्डातील कचरासंबंधी माहिती होण्याच्या दृष्टीने प्रत्येक वॉर्डातील समाज मंदिर, नागरी वसाहती इ.ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे स.सदस्यांना स्वेच्छा निधीमधून बसविण्यात यावे व यांची देखभाल व दुरुस्ती संबंधीत सोसायटीकडून हमीपत्र घेण्यात यावे व सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावे.

करीता,प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कचरु छगनराव घोडके **अनुमोदक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वच्छता अभियाना अंतर्गत वॉर्डातील कचरासंबंधी माहिती होण्याच्या दृष्टीने प्रत्येक वॉर्डातील समाज मंदिर, नागरी वसाहती इ.ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे हे स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून बसविण्यास व यांची देखभाल व दुरुस्ती संबंधीत सोसायटीकडून हमीपत्र घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३२, आंबेडकरनगर येथे ९० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती असून तेथे कामगार वर्गाची जास्त संख्या असल्याने त्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ५० खाटांचे सुसज्ज रुग्णालयाच्या इमारतीसाठी रु.०४ कोटीची आवश्यकता असून सदरील कामासाठी निधी मिळणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयात शिफारस करण्यात यावी.करीता,प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती भारती महेंद्र सोनवणे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक १११४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा मधील विकास कामे करणेसाठी दलित वस्ती पाणी पुरवठा मंत्रालय अंतर्गत खालील कामे करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविणेसाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. प्रबुध्दनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता रु.२० लक्ष.
२. प्रबुध्दनगर येथे सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी रु.२० लक्ष.
३. प्रबुध्दनगर येथील जुनी पाईपलाईन बदलण्याकरीता रु.२० लक्ष.
४. प्रबुध्दनगर येथे जी.आय.पोल बदलण्याकरीता रु.१५ लक्ष.
५. आम्रपालीनगर येथे जलवाहिनी टाकण्याकरीता रु.१० लक्ष.
६. आम्रपालीनगर येथे सिमेंट रस्ते तयार करण्याकरीता रु.१० लक्ष.
७. आम्रपालीनगर येथे विद्युत पोल बसविण्याकरीता रु.१० लक्ष.
८. आम्रपालीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे रु.८ लक्ष.

**सुचक:-**श्री.अफसर खान यासीन खान **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा अंतर्गत असलेल्या प्रबुध्दनगर व आम्रपालीनगर या दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती पाणी पुरवठा मंत्रालय अंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी निधी मिळण्याकरीता मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. प्रबुध्दनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता रु.२० लक्ष.
२. प्रबुध्दनगर येथे सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी रु.२० लक्ष.
३. प्रबुध्दनगर येथील जुनी पाईपलाईन बदलण्याकरीता रु.२० लक्ष.
४. प्रबुध्दनगर येथे जी.आय.पोल बदलण्याकरीता रु.१५ लक्ष.
५. आम्रपालीनगर येथे जलवाहिनी टाकण्याकरीता रु.१० लक्ष.
६. आम्रपालीनगर येथे सिमेंट रस्ते तयार करण्याकरीता रु.१० लक्ष.
७. आम्रपालीनगर येथे विद्युत पोल बसविण्याकरीता रु.१० लक्ष.
८. आम्रपालीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे रु.८ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा मधील विकासकामे करण्यासाठी अल्पसंख्यांक वस्ती (विशेष अनुदान) योजनेअंतर्गत खालील कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविणेसाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा येथे विविध ठिकाणी रस्त्याची कॉंक्रेटींग करणे | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा येथील जुना खुतूबपूरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे | २० लक्ष |
| ३. | जुना खुतूबपूरा येथे जि.आय.पोल बसविणे व लाईट लावणे | १० लक्ष |
| ४. | जुना खुतूबपूरा येथे जलवाहिनी टाकणे | १० लक्ष |

**सुचक:-**श्री.अफसर खान यासीन खान **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१८, जयसिंगपुरा मधील विकासकामे करण्यासाठी अल्पसंख्यांक वस्ती (विशेष अनुदान) योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी रु.६० लक्षचा निधी

मिळण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेस मुख्य रस्त्यांची कामे करण्यासाठी शासनाकडून २५० कोटीचे अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे. पैकी १५० कोटीचे अनुदान शासनाकडून प्राप्त होणार आहे.

तथापि, शहराची व्याप्ती, शहराचे ऐतिहासीक महत्व व पर्यटनाच्या दृष्टिने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर रस्त्यांची दुरावस्था बघता शहराची बदनामी होऊ नये म्हणुन शहरातील उर्वरित रस्त्यांची कामे अंदाजे १०० कोटीचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात **अनुमोदक:-**श्री.कचरु छगनराव घोडके

श्री.दिलीप थोरात :शासनाने १०० कोटी रस्त्यासाठी देणार आहे त्या बरोबरच महापालिकचे डिफर पेमेंटवर १०० कोटी मिळून यातून शहरातील आवश्यक रस्ते करण्यात यावे. तशी तरतूद करावी.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी डिफर वर जे रस्ते घेतले ते पुर्ण करावे त्यानंतर इतर डिफरचे रस्ते हाती घ्यावे. माझे वार्डातील ८ कोटीचे रस्ते बाकी आहे ते पुर्ण करावे.पाच पाच वेळेस टेंडर होऊन एजन्सी काम घेत नाही. या कामा बरोबरच त्या एजन्सीला किमान मनपाचे दोन कामे घेणेचे बंधन घालावे.

श्री.राठोड प्रमोद :१०० कोटीचे चार भाग करून काम करणार असाल तर २५ कोटीत मनपाचे १० कोटी टाकून अशा प्रकारे चार टप्प्यात रस्त्याची कामे करावी.यामूळे १४० कोटीची कामे होतील.

मा.महापौर :दरवर्षी रस्त्यावर मनपाचे पैसे खर्च होतात पॅचवर्क दरवर्षी करतो ते पैसे सेव्हींग होणार आहे. स.सदस्य यांनी सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी हा विषय मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराची व्याप्ती, शहराचे ऐतिहासीक महत्व व पर्यटनाच्या दृष्टिने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उर्वरित रस्त्यांची कामे अंदाजे १०० कोटीचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर करण्यास तसेच स.सदस्यांनी वरील केलेल्या सुचनेनूसार योग्य ती कार्यवाही करणयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३०, पवननगर येथील के-सेक्टर व एम-सेक्टर येथील खुल्या जागेतील सार्वजनिक विहिरीवरून पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टिने प्रत्यक्ष संबंधीत अभियंत्यासमवेत स्थळ पाहणी झालेली आहे. या वसाहतींमध्ये महानगरपालिकेची जलवितरण व्यवस्था कार्यरत आहे. मात्र या भागात पाणी पुरेशा प्रमाणात पोहचविण्यासाठी सदर व्यवस्था अपुरी पडते. त्यामुळे वस्तुस्थिती विचारात घेता येथील खुल्या जागेत असलेल्या सार्वजनिक विहिरीतून या भागात स्वतंत्र पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

त्यानुसार या भागाचे विस्तृत सर्वेक्षण करून अंदाजपत्रक तयार केले आहे. या अंदाजपत्रकात मुख्य जलवाहिनी ही १०० मीमी, १५० मीमी व्यासाची टाकणे व अंतर्गत भागात ६५ मीमी व्यासाची जी आय पाईप (Heavy) टाकण्याचे घेण्यास आले आहे. त्या शिवाय विहिरीतील पाण्याचा उपसा

करण्यासाठी पंपींग मशिनरीची तरतुद करण्यात आली असून विहीरी लगतच्या जागेवर सुमारे १.५० लक्ष क्षमतेचा ESR बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

अशा स्वरुपाचे समांतर पाणी पुरवठा व्यवस्था प्रस्तावित करणेसाठी खालील नमुद बाबी गृहीत धरण्यात आल्या.

| अ.क्र. | तपशील | गृहीते पवननगर | एल-सेक्टर व एम-२ |
|---|---|---|---|
| १. | एकूण घरे | ६५० | ११०० |
| २. | लोकसंख्या अंदाजे | ३२५० | ५५०० |
| ३. | पाणी पुरवठा (LPCD) | ४० | ४० |
| ४. | पाण्याची गरज | १३०००० लिटर्स | २२००००लिटर्स |
| ५. | Peak Factor | B | B |
| ६. | Demand Peak Factor | ५.३१ लि. | ४.९८ लि. |

या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची सन २०१५-२०१६ वापरात घेण्यात आली आहे. या अंदाजपत्रकात (अ) पवननगर व एल व एम-२ सेक्टरची पाणी वितरण व्यवस्था (ब) विहीरी वरील पाणी उपसा करणेसाठी पंपींग मशिनरी व (क) ESR ची तरतुद करण्यात आली आहे. (ड) तसेच प्रत्येक गल्लीत प्रत्येकी ३ स्टॅण्ड पोस्ट प्रस्तावित आहेत.

प्राथमिक नियोजनानुसार सुरूवातीला या विहिरीचे पाणी नागरीकांना पिण्याचे पाणी वापरा व्यतिरीक्त इतर वापरासाठी करता येईल. भविष्यात या पाण्याची आवश्यक ती तपासणी करून या विहीरीवर Water Purification Plant बसविण्याचे नियोजन करता यईल.

सदरची पाणी पुरवठा व्यवस्था चालविण्यासाठी महानगरपालिकेस अतिरीक्त खर्च ज्यामध्ये वीजेचा खर्च समाविष्ट आहे. त्यासाठी वार्षिक अर्थसंकल्पात तरतुद करावी लागेल. वसुली याच योजनेचा लाभ घेणाऱ्या नागरीकांकडून करता यईल.

करीता, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,२९,०७,००९/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन रमन चित्ते

**अनुमोदक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल,श्री.राजगौरव हरीदास वानखेडे,श्रीमती शोभा नारायण वळसे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३०, पवननगर, के-सेक्टर व एम-सेक्टर येथील खुल्या जागेतील सार्वजनिक विहिरीवरून नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी विविध कामे करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.१,२९,०७,००९/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संजयनगर, खासगेट, वॉर्ड क्र.५७ येथील ऐतिहासीक खासगेट (खास दरवाजा) चौकात हे ४०० ते ४५० वर्षापुर्वी सन १६१५ इ.स.मध्ये बांधण्यात आलेला ५२ दरवाज्यांपैकी एक होता. ७५% दरवाजाचा भाग आधीच भुईसपाट झालेला होता. तसेच उर्वरित २५% भागाची स्थिती ही धोकादायक होती. मनपातर्फे व हेरिटेज कमिटीच्या आदेशाअन्वये या गेटचे STRUCTURE AUDIT करण्यात आले असता, त्यात हा गेट सदरील व लोकांसाठी धोकादायक आहे. असे तथ्य समोर आले व १५ मीटर रुंद विकास योजनेमध्ये ही भाग बाधीत होता. त्यामुळे मनपातर्फे हा ऐतिहासीक दरवाजा चौकातून जमीनदोस्त करण्यात आला.

ऐतिहासीक वारसा व याची ख्याती भविष्यात ही लोकांना माहितीसाठी याच चौकात एक छोटेस सौंदर्य बेटात खासगेटची प्रतिकृती उभारण्यासाठी व त्यात ऐतिहासीक खासगेट (खास दरवाज्याची) माहिती दर्शविणाऱ्या माहितीचा फलक लावण्याची परवानगी या ठरावाद्वारे मांडण्यात येते.

तरी खासगेट (खास दरवाजा) चौकात एक छोटे बेट विकसीत करणे, खासगेटची प्रतिकृती बांधणे, माहितीचा फलक लावणे करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास **अनुमोदक:-**श्री.जागीरदार माहेम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १११९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११ मध्ये ८० ते ९० टक्के दलित वसाहत असुन सदरील वसाहतीत राहणाऱ्या रहिवासीयांचे जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१११ मध्ये अंतर्गत नाल्याची दुरुस्ती करणे ढापे टाकणे व नवीन बांधणे | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१११ मध्ये विविध ठिकाणी थ्री-सेट लाईट व हायमस्ट लाईट बसविणे | १० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१११ मध्ये विविध ठिकाणच्या | १० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१११ मध्ये स्मशानभुमी व कब्रस्तानात विद्युत व्यवस्था करून हायमास्ट लाईट बसविणे | १० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१११ पश्चिम इंदिरानगर येथे विविध ठिकाणच्या गल्लीत कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | ३० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.१११, शंभूनगर भागात विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१११, इंदिरानगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रेट रस्ते तयार करणे. | २० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१११, शंभूनगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रेट रस्ते तयार करणे. | २० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी

**अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन,श्री.जागीरदार माहेम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ११२०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ मध्ये राहुलनगर ही ८० टक्के दलित वसाहत असून सदरील वसाहतीत राहणाऱ्या रहिवासीयांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून पुढील

कार्यवाहीस्तव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | तरतुद |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत बाकी राहीलेल्या विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.२ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.३ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.४ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोलसह पथदिवे लावणे | १० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत लहान व मोठे गल्ल्यांत मुख्य रस्त्यावर गटार बांधून त्यावर ढापे व लोखंडी जाळ्या बसविणे. | १० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं. च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ९. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.७ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| १०. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.८ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ११. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.९ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |

**सुचक:-**श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५ मधील राहुलनगर या दलित वसाहतींमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी निधी मिळणे करीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | तरतुद |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत बाकी राहीलेल्या विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | २० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.२ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.३ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.४ चे उभ्या व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट | २० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | करणे. | |
| ६. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोलसह पथदिवे लावणे | १० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत लहान व मोठे गल्ल्यांत मुख्य रस्त्यावर गटार बांधून त्यावर ढापे व लोखंडी जाळ्या बसविणे. | १० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.६ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ९. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.७ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| १०. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.८ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |
| ११. | वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर अंतर्गत गल्ली नं.९ च्या उभ्या व सर्व आडव्या गल्ल्यांत कॉंक्रेट करणे. | २० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आमखास मैदानाजवळील सिटी क्लब असलेली जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची असून सध्या या सिटी क्लबचा वापर अत्यंत कमी होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या या जागेचा वापर शहरातील जनतेला व्हावा. अशी बहुतांश शहरवासीयांची इच्छा आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता सिटी क्लबचे मुळ उद्दिष्ठ कायम ठेवून महानगरपालिकेच्या या जागेवर बहुमजली इमारत महानगरपालिकेतर्फे बांधण्यात यावी व या इमारतीमध्ये सिटी क्लब तसेच शहरातील महिलांसाठी महिला सदन, ज्येष्ठ नागरीकांसाठी ज्येष्ठ नागरीक सदन आणि शहरातील सर्व मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने उपयुक्त असे उपक्रम राबविण्यासाठी बालसदन बांधण्यात यावे. या बहुमजली इमारतीच्या बांधकामासाठी आर्थिक तरतुद तसेच वास्तुविशारदाची नेमुणक आणि निविदा प्रक्रियेचे सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्तांना प्रदान करणे व इमारत बांधकामाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेले इतर सर्व अधिकार देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे,श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीत बहुतांश ठिकाणी मंजुर विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत असलेल्या जागेवर वसाहती झालेल्या आहेत. या वसाहती होवून १५-२० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा प्रकारे आरक्षणाने बाधीत असलेल्या जागेवरील वसाहती गुंठेवारी अधिनियमान्वये नियमाधिन करणे बाबत जा.क्र./मनपा/नरवि/गुंठे/१६९२/२००४ दिनांक ०२ जुलै २००४ नुसार शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असता शासनाच्या गुंठेवा/१००४/९८८/प्रक्र/ १०६/२००४ नवि-३० नगरविकास विभाग मंत्रायल मुंबई दिनांक १४ सप्टेंबर २००४ च्या अभिप्रायानुसार

महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधिन केल्यावर संबंधीत जागेबाबत विकास योजना किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतुदीमध्ये आपोआप फेरबदल झाल्याचे मानण्यात येईल अशी स्पष्ट तरतुद असल्याचे नमूद करून महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ ची आवश्यकता नाही असे म्हटले आहे. त्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जागांची खरोखरच आवश्यकता आहे काय? या बाबतचा निर्णय नियोजन प्राधिकरणाने द्यावा व सार्वजनिक हितासाठी जागा आवश्यक नसतील अशा जमीनीवर अस्तीत्वात असलेले भुखंड नियमित करता येतील असे सर्व महानगरपालिकांना कळविलेले आहे. त्यानुषंगाने आरक्षणातील ज्या मिळकती ०१ जानेवारी २००१ पुर्वीची आहेत तेव्हढेच क्षेत्र आरक्षणास पात्र राहील असे कळविलेले आहे.

त्यानुसार प्रभाग क्र.११०, मयुरबन कॉलनी शहानुरवाडी प्रभागातील शंभूनगर १६/पी वसाहत २० वर्षे जुनी असल्याने सदरील ठिकाणी आरक्षण क्रमांक २५९ उद्यान, आरक्षण क्रमांक २४८ खेळाचे मैदान, आरक्षण क्रमांक २५१ हेल्थ सेंटर अशी आरक्षण शंभूनगर वसाहतीत आहेत व सदरील आरक्षणावर १००% अनाधिकृत विकास झालेला आहे. तसेच उपरोक्त आरक्षण क्रमांक २५९,२४८,२५१ वरील आरक्षण वगळणे व गुंठेवारी भाग घोषीत करणे आणि तुळजाईनगरचा टोटल स्टेशन सर्व्हे करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१७-२०१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR-Ward-04-P-NO-26 अ.क्र.2 | वॉर्ड क्र.३, एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.<br>आर्थीक तरतुद ३० लक्ष. | वॉर्ड क्र.३, एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे.<br>या कामासाठी सदरील ३० लक्ष रुपयाचा निधी वळती करण्यात यावा. |

**सुचक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१७-२०१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR-Ward-04-P-NO-26 अ.क्र.2 | वॉर्ड क्र.३, एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. | वॉर्ड क्र.३, एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे.<br>या कामासाठी सदरील ३० लक्ष रुपयाचा |

| | | |
|---|---|---|
| | आर्थीक तरतुद ३० लक्ष. | निधी वळती करण्यात यावा. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराचे क्षेत्रफळ मोठ्या प्रमाणात वाढले असून बऱ्याच गावांचा/खेड्यांचा समावेश औरंगाबाद महानगरपालिकामध्ये करण्यात आलेला असल्याने मोठ्या प्रमाणात विकासात्मक कामे वाढलेली आहेत. औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर असलेला अधिकारी वर्ग मोठ्या प्रमाणात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाला आहे व सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर कमी प्रमाणात अधिकारी असून त्यांचेवर त्यांचे विभागाव्यतिरीक्त इतर विभागाचाही अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे कामाला गती मिळत नसून विकास कामाला खिळ बसली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३,दि.१७ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित सेवा/कामासाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करून सेवा करार पध्दतीने उपलब्ध करून घेण्याबाबतचे शासन निर्णय आहेत. त्याअनुषंगाने आवश्यक त्या कामासाठी महानगरपालिका आस्थापनेवरील सेवानिवृत्त झालेले अधिकारी वर्ग-१ व वर्ग-२ यांना तसेच भविष्यात निवृत्त होणारे अधिकारी यांना त्यांचा अनुभव लक्षात घेता उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील निर्देशानुसार नियुक्ती करण्यात यावी.

करीता, वरील शासन निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार सेवानिवृत्त झालेले वर्ग-१ व वर्ग-२ च्या संवर्गातील अधिकारी तसेच भविष्यात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यास करार पध्दतीने नियुक्ती देण्यास मान्यता देणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी

श्री.राजू शिंदे :ज्या शाळेत विदयार्थी संख्या जास्त आहे तेथे शिक्षक कमी असेल तर सेवानिवृत्त शिक्षक घ्यावे असे शाळेला पत्र पाठविले जेथे बालवाडी मुले-मुली जास्त आहे महिला बालवाडी शिक्षक तासिका बेस वर घेण्यास हरकत नाही.माझे वार्डातील शाळेत ८ वी ९ वी वर्ग सुरू झाले शिक्षक नाही.जेथे मुलींची संख्या आहे तेथे महिला शिक्षक असणे बधंनकारक आहे शासनाचा जी आर आहे. त्यानुसार शिक्षक देण्यात यावे.

मा.महापौर :विदयार्थी संख्या विचारात घेता जेथे शिक्षक कमी आहे त्याचे समायोजन करून त्या ठिकाणी शिक्षक देण्यात यावे. सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने हा विषय स्थागित करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ११२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी बंद अवस्थेत असलेल्या शालेय इमारती (१) सिडको. एन-६ (२) सिडको एन-९, (३) गितानगर, (४) हर्षनगर/लेबर कॉलनी, (५) हडको, एन-११ इत्यादी शाळेच्या इमारती बंद आहेत असे उपआयुक्त प्रशासन यांच्याकडून कळविण्यात आले होते की,

१. महानगरपालिका शाळा इमारती प्रत्यक्षात बंद पडलेल्या व या व्यतिरीक्त बंद झालेल्या शाळा शालेय वापरासाठी शैक्षणिक संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठी धोरण ठरविणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सविनय सादर.

२. महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळा/मैदाने महानगरपालिकेच्या शाळा सुटल्यावर सायंकाळच्या सत्रात महानगरपालिकेची इमारत/मैदाने शैक्षणिक वापरासाठी ज्या संस्था/व्यक्ती महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत कोचींग क्लासेस, कराटे क्लासेस, संगीत क्लासेस, डान्स क्लासेस, संगणक क्लासेस इत्यादी मोफत देणाऱ्या शैक्षणिक संस्थेस महानगरपालिकेच्या बंद असलेल्या शाळेच्या इमारती व त्या समोरील मैदाने भाडेतत्वावर देणे इत्यादीसाठीचे धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :तत्कालीन आयुक्त श्री.बकोरिया यांनी हा प्रस्ताव दिलेलाहोता आयुक्त बदलल्यानंतर धोरण बदल होते. विद्यमान आयुक्ताने या प्रस्तावा विषयी काय मत आहे.

श्री.प्रमोद राठोड :अटी शर्ती करून यास मंजूरी दयावी.

श्री.राजगौरव वानखेडे :अटी शर्ती काय करणार आहे रेडीरेकनर नुसार देणार काय रेट काय असणार आहे एन-११ येथील शाळेत सध्या वार्ड कार्यालय आहे. गितानगर येथील शाळेत आरोग्य केंद्र करण्याचे प्रपोजल होते असे असतांना भाडेतत्वावर या शाळा देता येईल का?

मा.महापौर :स.सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन जर त्या शाळेत प्रपोजल असेल तर चौकशी करून कार्यवाही नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

मा.महापौर : दुरूस्तीसह विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी बंद अवस्थेत असलेल्या (१) सिडको. एन-६ (२) सिडको एन-९, (३) गितानगर, (४) हर्षनगर/लेबर कॉलनी, (५) हडको, एन-११ प्रत्यक्षात बंद पडलेल्या महानगरपालिका शालेय इमारती व या व्यतिरीक्त बंद झालेल्या शाळा शैक्षणिक वापरासाठी शैक्षणिक संस्थेस भाडेतत्वावर देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात येत असून त्यास पुर्वलक्षी प्रभावाने मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>चर्चा</u>

श्री.राजू शिंदे :एकाच पदावर दोन अधिक-यांना पगार देता येत नाही ठराव सुध्दा मंजूर केला व त्यावेळी मुख्यलेखा परीक्षक यांनी सुध्दा म्हटले होते.व जे दोषी असेल त्यांचे पगारातून ते वसूल करावे असे आदेशीत केले होते.त्यावर मुख्य लेखा परीक्षक यांनी पत्र देऊन कळविले की ही प्रशासकीय बाब असल्याने काही करू शकत नाही. प्रशासन याची अमंलबजावणी करणार की नाही.शासनाला पत्र पाठवून मागदर्शन करण्याची मागणी केली चुका अधिकारी करणार शासनाचे मागदर्शन घेणार हे योग्य नाही.सध्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी असलेल्या श्रीमती जयश्री कुलकर्णी यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाचा पगार दिला जात नाही त्यांना घनकचरा व्यवस्थापनाचा पगार घ्यावा असे सांगितले जाते.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :तत्कालीन प्रशासन यांनी घनकचरा विभाग प्रमुख पद निर्माण करून त्या पदावर त्यांना देण्यात आले श्री.जगताप यांची बदली झाली त्यामूळे त्यांना पुर्वी त्यांचे जे पद होते त्या पदावर देण्यात आले आहे. |
| श्री.राजू शिंदे | :तसे झाले नाही. श्रीमती जयश्री कुलकर्णी महापालिकेतच सेवेत होत्या श्री. जगताप हे हेल्थ विभागाकडून आले ते नियमाने नगरविकास विभागाकडून यायला पाहिजे होते. ते आल्यानंतर आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाचा दोघांना पण पगार दिला गेला. |
| श्री.राठोड प्रमोद | :प्रश्न असा की एकाच पदावर दोन अधिकारी कार्यरत होते.एका अधिका-याला पेमेंट दिले दुसरे अधिकारी यांना त्याच पदाचे ६७-३ मध्ये पगार दिला गेला त्याची चौकशी करण्याचे सभागृहात आदेशीत केले होते परंतु मुख्य लेखा परीक्षक यांनी कळविले की हा प्रशासनाचा विषय आहे त्यांचे वतीने आले पाहिजे तेंव्हा`चौकशी करू असे म्हटले. ६७-३- क मधे जे पैसे दिले गेले त्यांची चौकशी आयुक्ताच्या लेव्हलवर करावी जे दोषी असेल कार्यवाही करावी. |
| श्री.राजू शिंदे | :मनपात आरोग्य वैद्यकीय अधिकारी असतांना शासनाकडून आलेले श्री.जगताप यांना रूजू करून घेतले दुसरी चुक श्रीमती जयश्री कुलकर्णी यांना दुसरे पद निर्माण करून त्या पदावर दिले. |
| मा.आयुक्त | :घनकचरा व्यवस्थापक कक्ष प्रमुख पदावर जी नियुक्ती दिली ते पद आपल्याकडे नव्हते.त्या पदास मान्यता नव्हती प्रशासनाने शासनाला त्यावेळी पत्र दिले आहे.शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून त्यांना ते पद दिले त्यांचेकडे एक मा.कोर्टाचे ऑर्डर आहे असे की त्या जर सेवेत असेल तर सॅलरी दयावी. शासनाला विनंती केली की त्या पदाला तात्पूरती त्या पिरीयड मधील मान्यता दयावी. |
| श्री.राजू शिंदे | :प्रशासकीय वेगळे मार्ग दाखवून शासनाची दिशाभूल करू नये.यात मनपाचे नुकसान झाले. श्री. जगताप व श्रीमती जयश्री कुलकर्णी यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून पगार दिला गेला. ज्या अधिका-याची चुक झाली त्यांचे पगारातून वसूल करावे. शासनाला जे पाठविले ते चुक आहे या संदर्भात मी मा.कोर्टात दाद मागेल.शासनाकडे धाव घेईल. |
| मा.आयुक्त | :याचा सविस्तर अहवाल पुढील सभेत देण्यात येइल. |
| श्री.प्रमोद राठोड | : जे पैसे दिले गेले मनपाचे नुकसान झाले.तांत्रिक बाबी तपासायला पाहिजे होत्या ते न तपासता पैसे देऊन टाकले ज्यांचेकडून पेमेंन्ट दिल्या गेले ते त्यांचेकडून वसुल करावे. |
| मा.महापौर | :या प्रकरणात सविस्तर चौकशी करून अहवाल देण्यात यावा. |

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.माहपौर यांनी घोषीत केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [४३]

## शुक्रवार दिनांक ०७.०७.२०१७ (दिनांक २०.०६.२०१७ रोजीची तहकूब सभा का.प.क्र ४३) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.पालिका सदस्य श्री.राजु रामराव शिंदे (प्रभाग क्र.३८)**

**प्रश्न क्रमांक ७१२:-**

बनेवाडी येथील ३० द.ल.ली. क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लॉंट लावण्याचे नियोजीत होते. त्यावेळेस महानगरपालिकेचे इंजिनियर यांनी व पीएमसीने यांचा विचार केला नव्हता का? ३० द.ल.ली. वरुन १० द.ल.ली. क्षमतेचा निश्चीत केले आहे. असे आपल्या मनाने करता येते का? या झालेल्या चुकीची जबाबदारी कोणाची?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (युआयडीएसएसएमटी, मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिकेच्या सदरील प्रकल्प प्रस्ताव अंतर्गत शहरातील खालील ६ विविध ठिकाणी २१६.०० द.ल.ली.क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र बांधणेचा समावेश करण्यात आलेला होता.

| | |
|---|---|
| कांचनवाडी | १३६.५ द.ल.ली. |
| सिध्दार्थ उद्यान | ४.५० द.ल.ली. |
| बनेवाडी | ३०.०० द.ल.ली. |
| झाल्टा | २०.०० द.ल.ली. |
| सिडको | १५.०० द.ल.ली. |
| पडेगांव | १०.०० द.ल.ली. |

प्रशासनाने बनेवाडी येथील प्रस्तावीत जागा मलजल प्रक्रिया केंद्र करीता आरक्षीत असल्याने या ठिकाणी ३०.०० द.ल.ली. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र प्रस्तावित केलेले होते. सदर ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचे कडून प्रकल्पाची संपुर्ण तांत्रिक तपासणी करून घेण्यात आलेली होती.

परंतु सदरील ठिकाणी अस्तित्वातील जुने एसटीपी पंप हाऊस, मास्टर चेंबर, मनपा हॉल, मनपा क्वॉर्टर पाडुन नविन मलजल प्रक्रिया केंद्र बांधणेस मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या मंजुरीनुसार प्रस्तावित निविन क्षमतेचे केंद्र प्रस्तावित करण्यात आलेले होते. परंतु नगर रचना विभागाने या जागेमधून १२.०० मीटरचा डीपी रोडचा प्रस्ताव दिल्याने प्रस्तावित ३०.०० द.ल.ली. क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्रा करीता अपुरी जागा उपलब्ध होत असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. पर्यायाने प्रशासनास या ठिकाणी जागेअभावी १०.०० द.ल.ली. क्षमतेचे उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले तसेच मलजल प्रक्रिया केंद्र मधील उर्वरीत २०.०० द.ल.ली. हे कांचनवाडी येथील सुधारीत १६१.०० द.ल.ली. क्षमतेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे योजनेत प्रस्तावित क्षमता चुकीची निश्चित केली असे म्हणता येणार आहे.

**प्रश्न क्रमांक ७१३:-**

प्रश्न क्र.०१ प्रमाणे एक नसून तीन ठिकाणी STP मध्ये बदल करीत आहात त्या क्षमतेच्या तुलनेची वाढ करून तब्बल तुम्ही तीन ठिकाणी बदल करत आहात. त्याऐवजी त्यामध्ये बदल करून मा.आयुक्तांच्या मंजुरीने मान्यता दिलेली आहे. त्या मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता नव्हती का? याला जबाबदार कोण? असे करता येते का? यांची माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (युआयडीएसएसएमटी, मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

- वरील प्रमाणे शहरातील विविध भागात २१६.०० द.ल.ली. क्षमतेचे ६ मलजल प्रक्रिया केंद्र बांधणेचे प्रस्तावित होते.
- सिध्दार्थ उद्यान येथील प्रस्तावित ४.५० द.ल.ली.क्षमतेचा मलजल प्रक्रीया केंद्र बांधणे बाबत प्रत्यक्ष जायमोक्यावर केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधीकरणाच्या (Central Zoo Authority) च्या पथकाने घेतलेल्या हरकती नुसार तसेच चिकलठाणा विमानतळ प्राधीकरणाने सदर प्रकल्पामुळे विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणात पक्ष्यांचा संचार होत असल्याने पर्यायाने विमानतळ/विमानाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून इतरत्र सदर प्रकल्प उभारणे बाबत कळविल्यानुसार/हरकत घेतल्यानुसार उक्त ठिकाणच्या प्रकल्पाची क्षमता कांचनवाडी व झाल्टा येथील मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

वरील नुसारच्या प्रस्तावित मलजल प्रक्रिया केंद्राच्या क्षमतेतील बदलास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७८२ दिनांक ३०.११.२०१६ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

**प्रश्न क्रमांक ७१४:-**

कांचनवाडी येथील प्रकल्पाची क्षमता १३६.५० द.ल.ली. प्रति दिन ऐवजी (१३६.५०+४.५०+२०.००) असे १६१ द.ल.ली. प्रतिदिन एवढी करण्यात आली आहे याची मा.सर्वसाधारण सभेत मान्यता का घेण्यात आली नाही? होणाऱ्या वेळोवेळी बदलाची पुर्वकल्पना मा.सर्वसाधारण सभेला व केंद्र आणि राज्य सरकारला कळविण्याची आवश्यकता होती का? याची माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (युआयडीएसएसएमटी, मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

- कांचनवाडी येथील मलजल प्रकल्पाच्या क्षमतेत झालेल्या बदलाच्या अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७८२ दिनांक ३०.११.२०१६ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे.
- सदरील योजनेत झालेल्या बदला बाबतची सविस्तर माहिती राज्य शासनास त्रैमासिक अहवाला अंतर्गत वेळोवेळी सादर करण्यात येत आहे.
- तसेच योजनेतील मलजल प्रक्रिया केंद्राच्या क्षमतेत बदलाबाबत तसेच सुधारीत प्रकल्प प्रस्ताव संदर्भाने अहवाल राज्य शासनास मनपा पत्र क्रमांक/काअ/युआयडीएसएसएमटी-मलनि:सारण प्रकल्प/२०१६/३५४ दिनांक २१.०६.२०१६ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

**प्रश्न क्रमांक ७१५:-**

नियोजनानुसार पडेगाव व वळदगाव शिवार येथे महानगरपालिकेला जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे आपल्या सांगण्यावरून कंत्राटदाराला जागा उपलब्ध करून देण्याचे अधिकार कोणी दिले? व विनंती करण्यात आली. त्याचा मान ठेवून कंत्राटदाराने जागा खरेदी केली यात विनंती कोणी कोणास केली? व कधी केली? यात मा.सर्वसाधारण सभेला विचारण्याची आवश्यकता वाटली नाही का? त्यासाठी त्यांनी खरेदी केलेले जागेचे भाव निश्चीतीचे अधिकार कोणाचे होते? व कोणत्या वर्षी जागा खरेदी केली? याची तारीख काय होती? जागा कोणाच्या नावाने रजिस्ट्री केली आहे? त्यावेळी मनपाची परिस्थिती खराब होती, आता मनपाची परिस्थीती सुधारली का? रक्कम देण्याबाबत जर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, तर मा.सर्वसाधारण सभेमध्ये कशासाठी आलेले आहे? प्राप्त अनुदानाच्या होणाऱ्या व्याजातून देण्याचे ठरविले आहे. तर या अगोदर व्याज मिळत नव्हते का?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (युआयडीएसएसएमटी, मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

या योजनेतहत विविध ठिकाणी सिवेज ट्रिटमेंट प्लॉट बांधणे व सिवेज पंपींग स्टेशन बांधणेसाठी जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. मात्र पडेगाव गोलवाडी व वॉर्ड क्र.९८ येथे महानगरपालिकेच्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने व कंत्राटदारास या कामासाठी

मनपाच्या या प्रकल्पाच्या उपांगासाठी जागा खरेदी करण्याची व या जागेचा मोबदला नंतर मा.सर्वसाधारण सभेच्या होणाऱ्या निर्णयानुसार अदा करण्यात येईल अशी विनंती महानगरपालिकेतर्फे करण्यात आली होती. प्रकल्प विहीत वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे असल्याने प्रकल्पाच्या STP व SPS या उपांगासाठी जमीन खरेदी करण्यास सांगण्यात आले होते. या साठी विहीत कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून जमीन कंत्राटदार यांनी मनपाच्या उपरोक्ष खरेदी केली आहे. सद्यस्थितीत या जागेवर या सर्व STP व SPS उभारणीचे काम करण्यात येत आहे. यापैकी पडेगाव येथे STP जमीन क्षेत्र ४० आर खरेदी करण्यास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.१४६ दिनांक २३.०३.२०१५ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. या सर्व जागांचा मोबदला देण्याबाबत प्रस्ताव मा.आयुक्त यांच्या परवानगीने मा.सर्वसाधारण सभे समोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला असून मागील सर्वसाधारण सभेत या प्रस्तावास तत्वत:मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याचा कारणापुरता उतारा प्राप्त होताच मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार व मनपाच्या नगर रचना विभागाचा अभिप्राय घेऊन कंत्राटदाराने मनपासाठी खरेदी केलेल्या जागेचा मोबदला कंत्राटदारास KIPL यांना देण्याची कार्यवाही करण्यात येईल व या जागेची मालकीची मनपाच्या नावे करण्यात येईल या प्रकल्पाच्या STP आणि SPS या उपांगासाठी लागणाऱ्या जागेची खरेदी एप्रिल २०१६ मध्ये करण्यात आली असून सर बाब अत्यावश्यक व धोरणात्मक असल्याने या बाबीस मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे. वरील परिच्छेदात नमुद नुसार कंत्राटदाराने खरेदी केलेल्या जागेचा मोबदला ज्या वर्षी देण्यात येईल तो त्या वर्षी अस्तित्वात असलेल्या सिध्द शिघ्र गणक (Ready Recnor) दरानुसार देण्याचे प्रस्तावित आहे. मुळ संकल्पनेनुसार या जागेचा मोबदला देणेसाठी महानगरपालिकेला अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करणे आवश्यक होते मात्र शासनाच्या दिनांक २७ मे २०१६ च्या निर्णयानुसार अशा स्वरुपाने अचानक समोर येणाऱ्या आकस्मिक खर्चाची पुर्तता करणे आवश्यक होते. मात्र शासनाच्या दिनांक २७ मे २०१६ च्या निर्णयानुसार अशा स्वरुपाने अचानक समोर येणाऱ्या आकस्मिक खर्चाची पुर्तता, या योजनेच्या शासनाकडून प्राप्त होणाऱ्या व बँक खात्यात या अनुदानाच्या रकमेवरील जमा होणाऱ्या व्याजाच्या रकमेतून अशा स्वरुपाच्या आकस्मिक खर्च भागविण्याचे अनुदेय करण्यात आल्याने या व्याजाच्या जमा रकमेतून सदर जमीन मोबदल्याची रक्कम कंत्राटदारास देण्याचे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ७१६:-</u>**

शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानावर नफा होणाऱ्या रक्कमेच्या व्याजामधून व्याजाचे पैसे मिळाले नसते तर आपण या पैशाची भरपाई कशातून केली असती? याची माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (युआयडीएसएसएमटी, मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

अशा परिस्थितीत प्रकल्पाच्या उपांगासाठी जमीन उपलब्ध करून देणे ही मनपाची वैयक्तिक जबाबदारी होती व त्यासाठी मनपाच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करणे आवश्यक होते.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद